# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै, २०२१

पृष्ठे ६८ किंमत : रु. १५

वर्ष एकविसावे

अंक सातवा




नवीन संहिता... नवा आशय...

# सुधा मूर्ती

यांच्या खास निर्व्याज, आकर्षक व सहजसुंदर शैलीत उतरलेल्या कथा

# आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी




अनुवाद
**लीना सोहोनी**

किंमत : ₹२५० । पोस्टेज : ₹५० । Book Available

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जुलै २०२१ ◆ वर्ष एकविसावे ◆ अंक सातवा

**संपादक**

सुनील मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १० |
| **एक एक पान घडताना...** | १४ |
| **पुस्तक परिचय** | |
| व्हेअर ईगल्स डेअर | २२ |
| ओरिजिन | २६ |
| आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी | ३० |
| **अभिप्राय** | ३६ |
| **दिनविशेष** | ६१ |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.



## बालसाहित्याच्या खजिन्यासोबत अनलॉकची सुरुवात....

एक विलक्षण संघर्षाचा काळ गेल्या दीड वर्षापासून आपण सगळेजण अनुभवतोय. देशात कोरोना विषाणूचा हाहाकार आणि त्यामुळे झालेल्या सक्तीच्या टाळेबंदीमुळे जवळपास सर्वच व्यवसाय पूर्णपणे बंद झाले होते; पण आता देश हळूहळू अनलॉक होतोय. काही ठरावीक आणि महत्त्वाच्या निर्बंधांसह जनजीवन पुन्हा एकदा पूर्वपदावर येतंय, हे चित्र खूपच आशादायी आहे. कोविडमुळे गेल्या दीड वर्षात अनेक क्षेत्रांवर मोठा परिणाम झाला; पण याचा सगळ्यात जास्त फटका बसला तो शिक्षण क्षेत्राला. गेल्या जूनपासून विद्यार्थ्यांनी शाळेचं तोंड बघितलं नाही. 'वर्क फ्रॉम होम' प्रमाणे 'लर्न फ्रॉम होम'चा नवा ट्रेन्डही देशात रुजू झाला आणि तो शाळांसोबत विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनीही आजमावला; पण याचे चांगले आणि वाईट असे दोन्ही परिणाम आपल्याला बघायला मिळतायत. कोविड निर्बंधामुळे शिक्षण पूर्णपणे बंद न होता तंत्रज्ञानाच्या जोडीने सुरू राहिलंय, एकीकडे मुलं ऑनलाइन अभ्यासवर्गात स्वतःला गुंतवून घेत आहेत तर दुसरीकडे शालेय वातावरण, नियमित अभ्यास, गृहपाठ, मैदानी खेळ या सगळ्या आवश्यक गोष्टींपासून मुलं दूर जात आहेत. आणि याचाच परिणाम त्यांच्या मनावर

अधिक होतोय. सतत बंद घरात राहणं, बाहेर खेळायला जाता न येणं, मित्र-मैत्रिणींना भेटता न येणं आणि याला पर्याय म्हणून टीव्ही, मोबाइल, कॉम्पुटर, गेम्स यांच्या आहारी जाणं या सगळ्यांमुळे लहान मुलांमधली चिडचिड आणि अस्वस्थता दिवसेंदिवस वाढताना दिसतेय. त्यातही दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षाच रद्द केल्यामुळे त्या विद्यार्थ्यांना असणारा मानसिक ताण हा वेगळाच आहे. शाळा-महाविद्यालयांतून होणाऱ्या असंख्य उपक्रमांमध्ये मुलांच्या शारीरिक आणि मानसिक ऊर्जेचा योग्य वापर केला जातो. ती ऊर्जा सध्या कुठेच वापरली जात नसल्याने मुलं घरी बसून निष्क्रिय होत आहेत की काय अशीही भीती भेडसावतेय; पण यावरही उपाय म्हणून पुस्तकंच आपल्याला योग्य तो मार्ग दाखवतात. शाळा सुरू होईपर्यंत मुलांकडे वाचनासाठी भरपूर वेळ आहे. आणि म्हणून खास लहान मुलांसाठी बौद्धिक खाऊ म्हणून आम्ही काही नवीन पुस्तकं घेऊन येत आहोत. ज्यामध्ये प्रसिद्ध लेखिका सुधा मूर्ती यांनी लिहिलेलं आणि लीना सोहोनी यांनी मराठीत अनुवादित केलेलं ‘आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी’ हे पुस्तक असून, हे पुस्तक म्हणजे गावाकडे राहणाऱ्या आजी-आजोबांकडे त्यांची नातवंडं सुट्टीत राहण्यासाठी येतात आणि आजी त्यांना रोज एक गोष्ट सांगते हे सूत्र. त्यामुळे हे पुस्तक एकदा मुलांनी हातात घेतलं की, ते संपूर्ण वाचल्याशिवाय हातातून खाली ठेवताच येत नाही. तिबेटियन धर्मगुरू प. पू. दलाई लामा यांनी लिहिलेल्या आणि योजना यादव यांनी अनुवाद केलेल्या ‘करुणेचं बीज’ या पुस्तकातून दलाई लामा यांच्या संपूर्ण जीवन आणि शिकवणुकीतून मिळणारे धडे याबद्दल लहान मुलांसाठी लेखन केलं आहे. फारूक एस. काझी यांनी ‘चुटकीचं जग’ या कादंबरीतून एका संघर्ष करणाऱ्या, लढणाऱ्या आणि जिंकून दाखवणाऱ्या मुलीची कथा उलगडून सांगितलीय. यासोबतच अकबर-बिरबलाच्या गोष्टींचा खजिनाही आम्ही लहान मुलांसाठी नव्याने घेऊन येत आहोत. ‘अशी जिरवली सरदाराची’, ‘अकबराचा जप’, ‘चिलखताची पारख’ आणि ‘दयाळू बिरबल’ अशी चार नवी पुस्तकं प्रकाशित होत आहेत.

लहान मुलांमध्ये असलेली वाचनाची आवड जोपासण्यासाठी आणि वाढवण्यासाठी अशी नवनवीन पुस्तकं आम्ही घेऊन येत राहू.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

---

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

---

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx



Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon | GET IT ON Google Play | Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**


**https://books.apple.com**



**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

**नवी संहिता... नवा आशय...**

परमपूज्य दलाई लामा यांचे जीवन आणि
त्यांच्या शिकवणीतून मिळणारे धडे




# करुणेचं बीज

**परमपूज्य दलाई लामा**

चित्रकार : **बाओ लु**

अनुवाद : **योजना यादव**

**किंमत : ८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

शांतता आणि प्रेम या बुद्धाने दिलेल्या देणग्यांच्या साथीने
स्वतःचे जग सुंदर करण्याचा प्रयत्न करणारी 'चुटकी'




# चुटकीचं जग

**फारूक एस. काझी**

**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

## फ्रँकफर्ट बुक फेअरचे यजमानपद स्पेनकडे...

२०२२मध्ये होणाऱ्या फ्रँकफर्ट बुक फेअरचं यजमानपद स्पेनने मिळवलंय. हे बुक फेअर म्हणजे आपल्या देशाची संस्कृती आणि साहित्य जगासमोर सादर करण्याची एक अनोखी संधीच असते. या कार्यक्रमाचे आयोजन ॲसिऑन कल्चरल एस्पनॉला (एसी/ई) आणि पुस्तक महासंचालनालय (सांस्कृतिक आणि क्रीडा मंत्रालय) यांनी परराष्ट्र व्यवहार व सहकार मंत्रालय, उद्योग, वाणिज्य आणि पर्यटन मंत्रालय, सर्व्हेन्ट्स संस्था आणि फेडरेशन ऑफ पब्लिशर्स गिल्ड ऑफ स्पेन यांच्या सहयोगाने केलं आहे.

स्पेनने ३० वर्षांपूर्वीच म्हणजे १९९१ मध्येच हे यजमानपद भूषवलेलं असून, २०२१ साठी असलेलं त्यांचं मुख्य उद्दिष्ट म्हणजे 'स्पॅनिश साहित्याचे परदेशातील ज्ञान सुधारणे' हे आहे. तसेच, स्पेनच्या अलीकडच्या इतिहासातील सर्वांत महत्त्वाच्या आणि मनोरंजक क्षणांपैकी एक अशी ही गोष्ट आहे. या खास कार्यक्रमात सादर करण्यासाठी स्पेनने स्पॅनिश सांस्कृतिक संस्थांच्या सहकार्याने कलात्मक प्रकल्पांची निवड केली आहे.

यंदाच्या बुक फेअरमध्ये जर्मन अनुवादांवर विशेष भर दिला जात आहे. २०२२पर्यंत जर्मन भाषेत भाषांतरित झालेल्या मूळ स्पॅनिश

पुस्तकांची संख्या वाढवणे, आपल्या साहित्याची आवड आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढवणे, स्पॅनिश साहित्यिक आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून




देणे आणि त्याबरोबरच साहित्यिक तसेच सांस्कृतिक माध्यमातून स्पेन आणि जर्मनीमधील सांस्कृतिक संबंध सुधारणे हा एसी/ई आणि पुस्तक संचालनालयाचा मुख्य हेतू आहे.

## झाली जरी टाळेबंदी, तरी पुस्तकांची होतेय निर्मिती
## टाळेबंदी दरम्यान अडीच हजारहून अधिक मराठी पुस्तकांचे प्रकाशन

कोरोना आणि टाळेबंदीच्या काळात अत्यावश्यक सेवा वगळता जवळपास सगळेच व्यवहार पूर्णपणे बंद झाले होते. याचा परिणाम प्रकाशन संस्था,



पुस्तक विक्रेते आणि वाचकांवरही तितकाच झाला. या गोष्टींचा विचार करून लॉकडाऊन काळातही पुस्तकविक्री आणि ग्रंथालये सुरू राहावीत यासाठी प्रकाशकांनी मागण्या केल्या होत्या. आणि त्याचं फलित म्हणजे २०२० ते २०२१दरम्यान देशात टाळेबंदी असूनही, जवळपास अडीच हजारांहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. या नैराश्याने भरलेल्या काळात नव्या

पुस्तकांच्या मदतीने जगणं सुकर करण्याचा प्रयत्न पुन्हा एकदा मराठी प्रकाशकांच्या पुढाकाराने केला गेला आहे. त्यातही १५०हून अधिक पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहेत, याचा विशेष आनंद आहे. एकीकडे सगळं जग ठप्प असताना वाचनसंस्कृती आणि पुस्तके यांना महत्त्व देऊन मराठी प्रकाशकांनी सुरू ठेवलेली आपली घोडदौड अतिशय कौतुकास्पद आहे.

या सर्व काळात विविध विषयांवर आधारित पुस्तके आपल्याकडून प्रकाशित झाली आहेत. ज्यामध्ये अनिल गांधी यांचे 'युद्ध कोरोनाशी,' रेई किमोरा यांचे 'मदाम बटरफ्लाय', बाबाराव मुसळे यांचे 'नो नॉट नेव्हर', के. आर. मीरा यांचे 'लेडी जल्लाद', अमेय जाधव यांचे 'जालियानवाला बाग', जितेंद्र दीक्षित यांचे '३५ दिवस', प्रतिमा कुलकर्णी यांचे 'रुजवाई', ध्रुव भट्ट यांचे 'कर्णलोक' आणि बहार दत्त यांचे 'हरित युद्धे' ही आणि अशी अनेक पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध झाली आहेत.

## पुस्तकांच्या पीडीएफ वितरणाविरोधात प्रकाशकांची पोलीस तक्रार..

पुस्तक प्रकाशन व्यवसाय अनेक समस्यांनी ग्रस्त असताना पुस्तकांच्या पीडीएफ वितरित करणे आणि पायरेटेड पुस्तकांची विक्रीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. अनेकदा वेगवेगळ्या माध्यमातून विनंती करूनही पीडीएफ वितरणांचा सायबर गुन्हा अनेकांकडून केला जात आहे. यासाठी ठोस उपाययोजनांची गरज आहे. आता तर मराठीतील पाचशेहून अधिक पुस्तकांची पीडीएफ विविध सामाजिक माध्यमांवरून फिरत आहे, ज्यात पुस्तके थेट तुमच्या डिवाईसवर डाऊनलोड करता येत आहेत. हे प्रकाशन व्यवसायावर गंभीर घाला घालणारे आहे. या पीडीएफ destinypublications91gmail.com या इमेलवरूनही वितरित होत आहेत. पोलीस कारवाईसोबतच शासकीय पातळीवर याबाबतची जनजागृतीही व्हावी, यासाठी प्रकाशक एकत्रित येत असून मुंबई आणि पुणे

पोलिसात यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात येत आहे.




इ-मेल, व्हॉट्स ॲप, टेलीग्राम, फेसबुक अशा विविध सामाजिक माध्यमांतून हल्ली पुस्तकांच्या पीडीएफ वितरित होताना दिसतात. वाचकांच्या अनेक ग्रुप्स मध्ये या पीडीएफची विचारणा होताना दिसते. त्यामुळे पीडीएफ वितरणाचा गैरकारभार करणारे अधिकच सोकावले जात आहेत. त्यामुळे अवैधरित्या पीडीएफ विकण्याचे प्रकार वाढत चालले आहेत.

पुस्तक प्रकाशन व्यवसायातील पायरसी ही फक्त प्रकाशकांनाच धोकादायक नसून, त्यामुळे सरकारचा करोडो रुपयांचा महसूल बुडत आहे. इन्कम टॅक्स, जीएसटी, छपाई-मुद्रणावरील कर अशा विविध कर-रूपात प्रकाशक लाखो रुपयांचा कर भरत असतो, पण तेच पायरेटेड पुस्तक छपाई करणारे महाभाग या सर्व गोष्टींना फाटा देत प्रकाशकांनी तयार केलेल्या पुस्तकांवर आयता नफा कमवत आहेत. पुणे व उपनगर, मुंबई व उपनगर परिसर आणि महाराष्ट्रातील सर्व प्रमुख जिल्ह्यात ही पायरेटेड पुस्तके फुटपाथवर विकली जातात. अशात आता सोशल मीडियाच्या माध्यमातून पुस्तकांच्या पीडीएफ वितरित करण्याचे प्रस्थ वाढू लागले आहे. काही लोकांनी या पीडीएफ विकण्याचा धंदाही सुरू केला आहे, याबाबत पोलिसांकडून, शासनाकडून तत्काळ कारवाई झाली नाही, तर प्रकाशन व्यवसायाचे व त्या अनुषंगाने लेखक, प्रकाशक, वाचक व व्यवसायावर अवलंबून असणाऱ्यांचे भरून न निघणारे नुकसान होणार आहे आणि पर्यायाने सरकारचेही.

पीडीएफ स्वरूपातील पुस्तकांबाबत वाचकांनीही जागरूक राहण्याची गरज आहे. या पीडीएफ अवैध असतात. हक्क संरक्षित असणाऱ्या पुस्तकांच्या पीडीएफ वितरित करणे कायद्याने गुन्हा असल्याने पीडीएफ वितरित करणाऱ्या वाचकांवरही गुन्हा दाखल होऊ शकतो. त्यामुळे वाचकांनीही सावध होणे गरजेचे आहे.

## एक एक पान घडताना...

–अनिल मेहता



*मेहता पब्लिशिंग हाऊसचं दोन हजारांहून अधिक पुस्तकांचं साम्राज्य उभं राहिलं त्यामागचं अखंड प्रेरणास्थान म्हणजे श्री. अनिल मेहता. कल्पकता आणि सचोटीचं आगळंवेगळं मिश्रण म्हणजे हे व्यक्तिमत्त्व. त्यांचा आजवरचा प्रवास निव्वळ मेहता पब्लिशिंग हाऊसच्या प्रवासाचीच झलक दाखवत नाही तर मराठी प्रकाशन व्यवसायातलं एक पर्व समोर उभं करतो. त्यांच्या या प्रवासाची झलक आमच्या या नव्या सदरातून आपण अनुभवणार आहोत.*

### कोल्हापुरात 'अजब पुस्तकालय'

खरं म्हणजे भविष्यात मी पुस्तकविक्रेता होईन किंवा त्याही पुढं जाऊन माझी वाटचाल ही प्रकाशन व्यवसायाकडं होईल, असं मला कधीच वाटलं नव्हतं; कारण पुस्तकविक्री किंवा प्रकाशन व्यवसाय हा आमचा पिढीजात व्यवसाय नव्हता. त्यातला मला काही अनुभवही नव्हता.

एकच गोष्ट आठवते, महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेवर असलेलं निपाणी हे माझं छोटंसं गावं. माझ्या वडिलांचं तिथं पूर्वीपासून

‘जनरल स्टोअर्स’ नावाचं एक स्टेशनरीचं दुकान होतं. आणि मी हायस्कूलला असताना निपाणीत आमच्या स्टेशनरीच्या दुकानात त्या वेळी सोलापूरहून सुरस ग्रंथमाला प्रकाशनाचे एक प्रकाशक त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तकं घेऊन अधूनमधून येत आणि वडिलांना विनंती करत की, ‘आमचं एखाद दुसरं तरी पुस्तक तुमच्या दुकानात ठेवा. पैसे पुस्तक विकले गेल्यानंतर द्या.’ मात्र निपाणीत पुस्तक विकत घेऊन वाचणार कोण? लोकांना तेवढी आवडच नव्हती; कारण गाव लहान होतं; पण माझ्या वडिलांना वाचनाची आवड होती. त्यामुळं वडील स्वतःसाठी फक्त ती पुस्तकं विकत घेत. त्यामुळं निपाणीच्या दुकानात शालेय पुस्तकं तेवढी विक्रीसाठी असायची. इतर पुस्तकांच्या विक्रीविषयी वडिलांनी कधी विचारही केलेला नव्हता.

१९६२मध्ये पुण्यातून बी.एम.सी.सी. कॉलेजातून माझं बी.कॉम. पूर्ण झालं आणि मी माझ्या मूळ गावात निपाणीला आलो. वडिलांनी तेव्हा आणखी एक जागा भाड्यानं घेऊन ‘अजब स्टोअर्स’ नावाचं नवीन दुकान भागीदारीत सुरू केलं होतं. मोतीलाल शहा नावाच्या त्यांच्या एका मित्राचा मुलगा अशोक व माझा लहान भाऊ प्रकाश असे दोघं मिळून ते दुकान चालवत होते. खरं म्हणजे प्रकाश माझ्यापेक्षा हुशार होता; पण दुकान सुरू केल्यामुळं त्याची मॅट्रीक झाल्यावर त्याला नाईलाजानं दुकानात बसावं लागलं होतं. बाकी दोन भाऊ अजून लहान होते. मी प्रकाशला मदत करू लागलो. वर्षभर मी मदत केली असेल; पण त्याच दुकानात काम करत राहण्यापेक्षा स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय करावा असं मला वाटू लागलं.

श्री. देवचंदजी शहा म्हणून त्या वेळी निपाणीत एक मोठे उद्योगपती होते. मी कॉलेजमध्ये असताना एकदा रेल्वेप्रवासात त्यांची भेट झाली होती. त्या वेळी त्यांनी मला ग्रॅज्युएशन पूर्ण झाल्यावर येऊन भेटण्यास सांगितलं होतं. मी त्यांच्याकडं गेलो व मनातील हा विचार बोलून दाखवला. उद्योगाच्या दृष्टीनं मला कोल्हापूर योग्य वाटत होतं. त्यांनाही ते पटलं. त्यांनी त्यासाठी मला कोल्हापुरात जागा मिळवून दिली व भांडवलही दिलं.

आणि १९६५मध्ये मार्च - एप्रिलच्या काळात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मी कोल्हापूरला भाऊसिंगजी रोडवर, भवानी मंडपाच्या परिसरात ‘अजब पुस्तकालय’ हे दुकान सुरू केलं.

‘अजब पुस्तकालय’ हे नाव ठेवण्यामागचं कारण म्हणजे या नावाशी एक वेगळंच नातं होतं; कारण आमच्या निपाणीच्या दुकानाचं नाव ‘अजब

स्टोअर्स' होतं व हेच नाव वडिलांना अतिशय भावलेलं होतं. याशिवाय आम्ही नावाप्रमाणं चांगलं भलं मोठंच दुकान थाटलं. जे कोल्हापुरात बघणाऱ्यालाही अजबच वाटावं. अर्थात दुकानाचं नाव जरी 'अजब पुस्तकालय' असलं तरी सुरुवातीला मी दुकानात पुस्तकांसोबतच वह्या, कंपास बॉक्स, पेन, पेन्सिल, तेल, साबण अशा अनेक प्रकारच्या वस्तू ठेवलेल्या होत्या; कारण पुस्तकं किती व कशी विकली जातील याचा अंदाज नव्हता आणि पुस्तकं कशी, कोणती व कुठून मागवायची, ती कशी विकायची अशा सर्वच बाबतीत मी अनभिज्ञ होतो. इथं वडिलांचे संबंध मला फार उपयोगी आले. बेळगावमध्ये कित्तूर असं आडनाव असलेले वडिलांचे एक मित्र होते. 'सरस्वती बुक डेपो' हे त्यांचं तिथं पुस्तकांचं दुकान होतं. वडील त्यांच्याशी बोलले. आम्ही कोल्हापुरात नवीन दुकान सुरू करतोय म्हटल्यावर त्यांना आनंद झाला. त्यांनी हवी ती मदत करण्याचं वडिलांना कबूल केलं. वडिलांनी त्यांना त्यांच्याकडचा रवींद्र नावाचा माणूस एक वर्षासाठी कोल्हापूरच्या दुकानात पाठवा, म्हणून विनंती केली. आणि त्यांनी त्याला पाठवलं. त्यानं मला दुकान कसं चालवायचं याचं प्रशिक्षणच दिलं. जे मला अत्यावश्यक होतं. पुस्तकांचे गठ्ठे कसे बांधावेत, पुस्तकांच्या ऑर्डर्स कशा द्याव्यात, अशा पुस्तक खरेदी-विक्रीसंबंधीच्या अनेक गोष्टी शिकवल्या. जे मी कधीच विसरू शकत नाही. कणगलेचा राम नावाचा आणखी एक मुलगा आमच्यासोबत होता. आम्ही तिघंही सकाळी आठ ते रात्री एक - दोन वाजेपर्यंत काम करायचो. राहायचोही तिथंच, दुकानाच्या मागील बाजूला एका खोलीत. माझी पत्नी तेव्हा गरोदर होती. ती तेव्हा सांगलीला माहेरी होती. मी दर शनिवारी दुपारी दोनपर्यंत दुकानात काम करून मग सांगलीला जायचो व रविवारी सकाळच्या गाडीनं परत यायचो.

कोल्हापुरात माझ्या दुकानाच्या परिसरात व इतरत्रही पुस्तकविक्रीची त्या वेळी अनेक ठिकाणं होती व ती मंडळी चांगलीच प्रस्थापित झालेली होती. वर्षानुवर्षं ती मंडळी पुस्तकविक्रीचा व्यवसाय करत होती आणि निपाणीतून कोल्हापुरात आलेला मी अगदीच नवीन होतो; पण तरीही माझ्या दुकानाची अल्पावधीतच प्रसिद्धी झाली. त्याला काही कारणं होती. पहिलं म्हणजे, माझ्या दुकानाच्या आसपासचा परिसर शाळांचा होता. करवीर वाचन मंदिरही जवळच होतं. दुकान शहराच्या अगदी मध्यावर होतं. दुसरं कारण म्हणजे दुकानाची भव्यता व नाव. आणि मला वाटतं, तिसरं कारण म्हणजे मी

ग्राहकांना सांभाळायचो. त्यांना जोडून घ्यायचो.

मला ग्राहकांशी बोलायला आवडायचं. त्यांच्याशी मी संवाद साधायचो. त्यांच्या आवडीनिवडी जाणून घ्यायचो. 'पुस्तक संपलं आहे; पण नवी ऑर्डर गेली आहे.' 'दोन दिवसांनी जरूर या.' 'पुस्तक तुमच्या नक्की हातात पडेल' 'आणि अगदीच घाई असेल तर तुम्हाला त्याच तोडीचं दुसरं उत्तम पुस्तक किंवा गाइड देतो. ते घेऊन जा, नाही आवडलं तर परत करा.' असं म्हणून ग्राहकांना दिलासा द्यायचो. त्यामुळं मला सुरुवातीपासून ग्राहक चांगले मिळत गेले. नवीन आहे म्हणून कोठे काही अडलं नाही.

माझ्या लक्षात आलं, की ग्राहकांना शालेय पुस्तकांव्यतिरिक्त इतरही पुस्तकं हवी आहेत; पण ती पुस्तकं कोल्हापुरात लवकर मिळत नाहीत. माझं इंग्रजी चांगलं होतं. इंग्रजी पुस्तकं मी वाचत होतो आणि पुस्तकांची मला माहिती होती. त्यामुळं मराठी, इंग्रजी भाषेतील विविध पुस्तकं मी माझ्या दुकानात ठेवू लागलो. दुकानातील या निरनिराळ्या पुस्तकांविषयी मी ग्राहकांना माहिती द्यायचो. नवीन पुस्तकांच्या जाहिरातींची पोस्टर्स दुकानात लावून त्याविषयी ग्राहकांच्या मनात जिज्ञासा निर्माण करायचो. त्यामुळंही माझं दुकान अधिक वेगळं, ताजं, आधुनिक, क्रियाशील वाटू लागलं. त्याचा फायदा चोखंदळ रसिक वाचकांना होऊ लागला. त्यामुळं हळूहळू अनेक कॉलेजेसचे प्रोफेसर, प्राचार्य, ग्रंथपाल यांसारखी बरीच बडीबडी मंडळी माझ्या दुकानाशी जोडली गेली. त्यातून ओळखी आणखी वाढत गेल्या. ग्रंथालयांचे गिऱ्हाईक जोडले गेले. दुकानातील ललित साहित्याची पुस्तकं जोरात खपू लागली. पुस्तकं इतक्या चांगल्या प्रकारे मी विकू शकतो हे माझ्या लक्षात आलं, तेव्हा मी दुकानात इतर स्टेशनरी सामान ठेवायचं बंद केलं व फक्त पुस्तकविक्रीवर लक्ष केंद्रित केलं.

यातून पुण्या-मुंबईतल्या प्रकाशकांना समजलं, की हा बऱ्याच प्रकारची पुस्तकं दुकानात ठेवतो. त्यामुळं ते स्वतःहून संपर्क साधू लागले. पुस्तकं उधार देऊ लागले. इंग्रजी प्रकाशकांचे प्रतिनिधी माझ्याकडं येऊ लागले. 'ऑन सेल बेसिस म्हणजे पुस्तकं विकली गेली तर पैसे द्या; नाहीतर ती परत पाठवा, या पद्धतीनं माझ्याकडं त्यांची पुस्तकं येऊ लागली. पुस्तकांचा साठा वाढत गेला. लोकांना समजत गेलं, की इथं उत्तम पुस्तकं हमखास मिळतात व उपलब्ध नसली तर ती ताबडतोब मागवून दिली जातात.

'अजब पुस्तकालय' हे दुकान कोल्हापुरातील पुस्तकांचं मोठं दुकान

म्हणून ओळखलं जाऊ लागलं. या दुकानाची स्वतःची अशी ओळख निर्माण झाली. आज हे मूळ दुकान सोडून मला पंचवीस वर्षं होऊन गेलीत, तरीही गंमत म्हणजे आजही लोक मला 'अजब' नावानंच ओळखतात.

मधल्या काळात ९ मे, १९६५ला मला मुलगी झाली. मुलीचं नाव शर्मिला ठेवलं. आम्हा भावांना बहीण नव्हती व मी घरात मोठा. त्यामुळं घरात मुलगी झाल्याचा सर्वांनाच खूप आनंद झाला. मी कोल्हापुरात तीन खोल्यांचं एक घर भाड्यानं घेतलं. पत्नी व मुलीला कोल्हापुरात आणलं. माझे आई-वडील दर शनिवार-रविवार निपाणीहून माझ्याकडं येऊ लागले. शर्मिलाला खेळवण्यात, तिचा सांभाळ करण्यात त्यांचा वेळ छान जाई. अधूनमधून मी जेव्हा पुण्याला खरेदीला जायचो, त्या वेळी माझे वडील दुकान सांभाळत असत. कुटुंब जीवनातही मी आता स्थिर होऊ लागलो.

मी अतिशय वक्तशीर माणूस आहे. सकाळी साडेआठला माझं दुकान उघडलंच पाहिजे, हा माझा मी मला घालून घेतलेला नियम होता. गोष्टी वेळच्या वेळी झाल्या पाहिजेत. शिस्त हवी. ती नसेल तर आयुष्यात विस्कळीतपणा येतो, असं मला नेहमी वाटतं. मी सायकलीवरून घरातून बाहेर पडलेलो दिसलो, की गल्लीतलेही म्हणायचे, 'मेहता बाहेर पडले म्हणजे आता बरोबर साडेआठला पाच मिनिटे कमी असतील.' मला ओळखणाऱ्या सर्वांना माझा हा वक्तशीरपणा माहीत आहे. मी कोणाला वेळ दिलेली असेल, किंवा कोणाची वेळ मागून घेतलेली असेल, तर मला एक मिनिटसुद्धा इकडं- तिकडं चालत नाही. गिऱ्हाइकाच्या बाबतीतही वेळेत डिलिव्हरी हे धोरण मी कायम पाळत आलो आहे. मला माझ्या या गुणाचा व्यवसायासाठी अतिशय उपयोग झाला. त्यामुळं गिऱ्हाइकांशी विश्वासाचं नातं मी जोडू शकलो.

त्याबाबत एक आठवण सागंतो.  माझ्याकडं शिवाजी विद्यापीठातील व अनेक महाविद्यालयांचे प्राध्यापक पुस्तकं घेण्यासाठी येत; कारण त्यांना हवं असलेलं पुस्तक माझ्याकडं हमखास मिळतं, अन् समजा नसेल तर कुठून का होईना हा माणूस ते पुस्तक उपलब्ध करून देतो, याची त्यांना खात्री असे. एकदा असाच मनात विचार आला, की आपण प्रत्यक्ष शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयालाच पुस्तकं का पुरवू नये? हेही आपण करून बघायला हरकत नाही. ती ऑर्डर नक्कीच मोठी असेल.

पण, हा विचार अमलात कसा आणावा? मी बराच काळ विचार करत

राहिलो. कसं करावं ते सुचेना. मग एकदा अगदी ठरवून सरळ विद्यापीठाच्या ग्रंथपालांना, श्री. टिकेकर यांना भेटलो.

ते म्हणाले की, तुम्हाला हे काम काही जमणार नाही. वेळेत ऑर्डर पूर्ण कराल का?

मी म्हटलं, 'एखादी ऑर्डर तर देऊन बघा, सर.'

ते तयार झाले.

त्याच वेळी विद्यापीठात लायब्ररी सायन्सची परीक्षा होणार होती. त्यासाठी विद्यार्थ्यांना रंगनाथन यांचं 'कॅटलॉगिंग' नावाचं पुस्तक ताबडतोब हवं होतं. त्याची ऑर्डर त्यांनी मला दिली. 'सात दिवसांत पुस्तके द्या' म्हणाले.

आणि त्यांना मी पाचव्याच दिवशी पुस्तकं आणून दिली. ते खूश झाले.

ती पुस्तकं मागवायला खरं तर मला अनेक अडचणी आल्या होत्या. मी प्रकाशकाला ट्रंक कॉल लावायचो. तर ते म्हणायचे, 'बँक ड्राफ्ट पाठवा.' पार्सल तर आलं; पण माझ्याकडं पार्सलची पावती नव्हती. घाटगे - पाटीलवाले पावतीशिवाय पार्सल देईचनात. मग मी म्हटलं, 'पार्सलच्या किमतीएवढे पैसे ठेवून घ्या.' त्यांनी ते कसंबसं मान्य केलं. त्यानंतर मग ती पुस्तकं ग्रंथपाल श्री. टिकेकर यांच्याकडं पोचती केली. नंतर टिकेकरांनी मला मार्गदर्शन केलं. 'विद्यापीठाला पुस्तकं पुरवायची असतील, तर तिथल्या वेगवेगळ्या विभागांना भेटून तुमच्या पुस्तकांच्या याद्या तिथं दाखवत जा' म्हणाले. त्यानुसार मी आठवड्यातून तीन ते चार वेळा वेगवेगळ्या विभागांना भेटून त्यांना कोणती पुस्तकं हवी आहेत, याविषयी चर्चा करून त्याच्या याद्या गोळा करायचो आणि पुस्तकांच्या ऑर्डर्स घ्यायचो.

तिथून पुढं विद्यापीठातून पुस्तकांच्या ऑर्डर्स मिळणं सुरू झालं, ते आजतागायत. हा अनुभव मला फारच महत्त्वाचा ठरला. एक मोठी झेपच होती ही. हळूहळू पश्चिम महाराष्ट्रातील ग्रंथालयांमध्ये व शिवाजी विद्यापाठाच्या जवळजवळ सर्व कॉलेजेसमध्ये आम्ही पुस्तकं देऊ लागलो. अगदी गोव्यातील विद्यापीठात, मंत्रालयातही आम्ही पुस्तकं दिली. आमची सेवा अतिशय वेगवान असायची. शिवाय चोख. जर पुस्तकं पाठवताना काही पुस्तकं खराब झाली, फाटली तर ती आम्ही पुन्हा नवीकोरी पाठवत असू. आणि पुस्तकं त्यांना हवी तीच, त्यात बदल नाही. त्यामुळं गिऱ्हाइकांचा विश्वास संपादन करत गेलो. बऱ्याचदा त्या त्या शिक्षण संस्थांकडं अनुदान

आल्यानंतर ते वर्षभरानं पैसे देत; पण म्हणून आम्ही त्यांना पुस्तकं द्यायचं थांबवलं नाही. तेही लोक न चुकता अनुदान आलं की पैसे आणून देत. संस्था चांगली आहे व ती उभी राहण्यासाठी आपला हातभार लागतोय यात समाधान असे.

कोल्हापुरातील ए. डी. शिंदे सर माझ्या दुकानात बऱ्याचदा येत असत. कॉमर्सला ते अकाउन्टन्सी शिकवत. त्यांचं ऑफिस माझ्या दुकानाजवळच होतं. त्यांनी सायबर ही शिक्षणसंस्था त्या वेळी नव्यानंच सुरू केली होती. त्या वेळी ते मला म्हणाले की 'या संस्थेसाठी तू पुस्तकं पुरवायची आहेस व त्याचे पैसे तू मला मागायचे नाहीस. मला जेव्हा वाटेल तेव्हा मी तुला ते देईन.' माझा त्यांच्यावर विश्वास होता. त्यांना जवळजवळ एक लाख रुपयांची पुस्तकं हवी होती, ती मी त्यांना पुरवली. त्यानंतर एक-दीड वर्षांनी त्यांनी त्याचे पैसे दिले. मी त्यांच्याकडं कधीही पैसे मागितले नाहीत.

पहिल्याच वर्षी एकदा दुकानात बसलेलो असताना मला लक्षात आलं, की त्या वेळी शिवाजी विद्यापीठातील प्री डिग्रीचं हिंदीचं एक पुस्तक बदललेलं होतं. त्याला मागणी होती. अन् ते होतं आग्र्याच्या रामप्रसाद पब्लिशरचं. नेमका त्यांचा प्रतिनिधी माझ्या वडिलांना पुण्यात भेटला. त्यानं वडिलांना विचारलं की, तुम्ही आमच्या या पुस्तकाची एजन्सी घेऊ शकाल का? वडिलांनी कोल्हापुरात आल्यावर मला तसं सांगितलं. मी लगेच ठरवलं, की ही एजन्सी घ्यायचीच. दुसऱ्याच दिवशी मी मुंबईला व तिथून आग्र्याला गेलो. त्या मालकाला भेटलो व त्यांना प्रस्तावच दिला. त्यांना म्हटलं, 'मी एका वेळेला या पुस्तकाच्या दोन हजार प्रती घेतो. तुम्ही फक्त पश्चिम महाराष्ट्रातील विक्रेत्यांनी तुम्हाला पुस्तक मागितलं तर ते माझ्याकडं उपलब्ध आहे असं सांगा.' ते तयार झाले. या पुस्तकाचे एकमेव विक्रेते म्हणून त्यांनी माझी नेमणूक केली. त्यांनी मला दोन हजार प्रती दिल्या. त्यामुळं माझा फायदा असा झाला की सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी अशा पाच-सहा जिल्ह्यांतील सर्व पुस्तक विक्रेत्यांमध्ये अजब पुस्तकालयाचं आपोआपच नाव झालं. त्यामुळं त्यांच्या ऑर्डर्स माझ्याकडं येऊ लागल्या.

पुण्याहून गाइड्स प्रकाशित करणारी 'रॉयल बुक स्टॉल' म्हणून एक संस्था होती. मिस्टर सहानी त्याचे मालक होते. आमच्या दुकानाची भव्यता बघून ते शंभर ते दोनशे प्रती माझ्याकडं उधार ठेवूनच जात. माझ्याकडं ती

हमखास विकली जायची. मी त्यांना वेळेवर पेमेन्ट देत असे. होलसेल व रिटेल व्यापार चालू झाला.

१९६८-६९ असं ते वर्ष असेल. एकदा मनात आलं, की ही मंडळी पुण्याहून कोल्हापुरात येऊन गाइड विकतात. मग आपणच ती इथं का प्रकाशित करू नये? पण, मला त्यातलं काहीच माहीत नव्हतं. मी एका प्रकाशकाला गाइड कसं काढतात? कागद कसा असतो? कुठून मिळतो? ते कसं लिहितात, कसं छापतात? असे अनेक प्रश्न विचारले. त्यांनी मला सविस्तर माहिती सांगितली. ती ऐकून मला वाटलं, की आपण या नव्या व्यवसायातही उडी मारायला हरकत नाही. आपल्याला हे जमू शकेल.

त्या काळात अकरावीनंतर प्री डिग्री असायची. त्याचं इंग्रजीचं गाइड काढायचं मी ठरवलं. एक प्राध्यापक उत्तम गाइड लिहू शकतात, याचा मला अंदाज होता. त्यांच्याकडून मी ते लिहून घेतलं. सुदैवानं, पोलीस स्टेशनजवळ एक प्रिंटिंग प्रेस मी बघितली होती. जयाजीराव शिंदे नावाचे एक गृहस्थ होते, त्यांची ती होती. मी त्यांच्याशी ओळख करून घेतली. ते एक मासिक काढत. ते चांगले प्रूफरीडरही होते. मला ते योग्य वाटले. त्यांच्याकडं मी गाइड्स छापून घेतली. गाइड उत्तम विकलं गेलं. मग मला चटकच लागली. मी अनेक विषयांची गाइड्स प्रकाशित केली. त्यासाठी कोल्हापुरातील व आसपासच्या भागातील तरुण प्राध्यापकांना व लेखकांना हाताशी धरलं. त्याचप्रमाणं क्रमिक पुस्तकं लिहिणारे काही प्राध्यापक माझ्या ओळखीचे होते. त्यांना लेखनासाठी प्रवृत्त केलं. प्रा.जयसिंगराव पवार, प्रा. नसिराबादकर, प्रा. रा. तु. भगत आणि खतीब अशा अनेक लेखकांची क्रमिक पुस्तकं मी एकापाठोपाठ एक प्रकाशित करत गेलो. संदर्भ पुस्तकंही मोठ्या प्रमाणात काढली व ती विकली. त्यातून पुस्तकविक्री या व्यवसायसोबतच प्रकाशन व्यवसायही मला अवगत होऊ लागला. त्याचप्रमाणं शिवाजी विद्यापीठातील पाचही जिल्ह्यांतील पुस्तकविक्रेते माझ्याकडून पुस्तकं घेऊ लागले.

मध्यंतरी १९७०मध्ये रस्ता रुंदीकरणामध्ये आमच्या दुकानाची पुढील भागाची जागा गेली; पण सुदैवानं मला मागची जागा मिळाली. ती छोटी होती. एवढी पुस्तकं ठेवायची कुठं, म्हणून मी दोन मजले बांधले. पुस्तकांसाठी मग ऐसपैस जागा झाली.

(क्रमशः)

## पुस्तक परिचय

TBC-30 Book No. 2




# व्हेअर ईगल्स डेअर

■

लेखक : **ॲलिस्टर मॅक्लीन**

अनुवाद : **माधव कर्वे**

■

दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरील
थरारक, रहस्यमय कादंबरी

‘युद्धस्य कथा: रम्या:’ असं एक वचन आहे. यद्ध... मग ते पुराणकालीन असो, इतिहासकालीन असो, की नजीकच्या काळातील असो! त्यातल्या रणकंदनाची, जय-पराजयाची आणि युद्धातल्या विशेष घटना-प्रसंगांची उजळणी पिढ्यान्‌पिढ्या होत राहते. त्यातल्या पराक्रमी वीरांच्या शौर्याची इतिहासात नोंद केली जाते.

दुसरे महायुद्ध हे जागतिक स्तरावर घडलेलं महायुद्ध. दुसरे महायुद्ध म्हटलं, की बहुतेकांना हिटलर आणि त्याचे युरोपात पसरत जाणारे साम्राज्य एवढेच आठवते. विस्तारवाद आणि निरंकुश सत्तालालसेपायी मोजके देश वगळता जगभर युद्धाचा वणवा पसरला होता. हिटलर-मुसोलिनी यांनी लाखो ज्यूंची कत्तल केली. छळछावण्यांमधून त्यांची निर्घृण हत्या केली. आक्रमण आणि प्रतिकारामध्ये फक्त सैनिकच नव्हे, तर निपराधांचाही बळी गेला.

अशा युद्धजन्य परिस्थितीत (युद्ध थंडावल्यानंतर एकाहून एक सरस बेस्टसेलर कादंबऱ्या लहिणारे) ॲलिस्टर मॅक्लीन १९४१मध्ये नेव्हीत दाखल झाले. त्यांच्या कामगिरीची सुरुवात ॲन्टी-एअरक्राफ्ट गन्स असलेल्या जहाजावर इंग्लंड आणि स्कॉटलंड समुद्रकिनाऱ्यावर झाली. दोन वर्षांच्या कारकिर्दीच्या अखेरीस जपानने त्यांना कैद केले. त्यांनी युद्ध जवळून पाहिलं. अनुभवलं. युद्धपश्चात ग्लासगो विद्यापीठातून इंग्लिशची पदवी मिळविल्यानंतर त्यांनी शिक्षकी पेशा पत्करला. आणि त्यांच्या कादंबरी लेखनाला सुरुवात झाली. साहजिकच त्यांच्या बहुतांश (एकूण २७) कादंबऱ्यांत युद्धातल्या थरारक आठवणींवर आधारित कथानकं आहेत. लेखनतंत्रावर हुकमत असलेल्या मॅक्लीनची वर्णनशैली इतकी विलक्षण आहे, की वाचताना घटना-प्रसंगाचं हुबेहूब चित्र डोळ्यांसमोर उभं राहतं. कादंबरीच्या निमित्ताने ते जेव्हा जगातल्या वेगवेगळ्या स्थळांचं वर्णन करतात, ते एवढं प्रत्ययकारी असतं की वाचनातून आपण पर्यटनाचाही आनंद घेतो.


‘व्हेअर ईगल्स डेअर’ ही त्यांची अशीच अत्यंत गाजलेली युद्धकथा. त्यांच्या बहुतांश कादंबऱ्यांवर हॉलिवूडने चित्रपट काढले. ‘व्हेअर...’ हा चित्रपटही खूप गाजला. त्या काळचे हॉलिवूडचे सुपरस्टार रिचर्ड बर्टन आणि क्लिंट ईस्टवूड यांनी त्यात मध्यवर्ती भूमिका केल्या होत्या. या चित्रपटाच्या

माध्यमातून प्रेक्षकांनी दुसरं महायुद्ध अक्षरश: अनुभवलं.

अमेरिकन आर्मीचा ब्रिगेडिअर जनरल जॉर्ज कार्नेबी विमानातून प्रवास करत असताना ते विमान पाडून त्याला कैद करण्यात येते. युद्धाच्या बाबतीतल्या प्लॅनिंगचा तो प्रमुख असतो. बव्हेरियातील आल्प्सच्या पर्वतराजीतील श्लॉस ॲडलर या दुर्गम किल्ल्यात त्याला ठेवलेलं असतं. त्याला सोडविण्याची कामगिरी कमांडोच्या एका पथकावर सोपविण्यात येते. या पथकाचे प्रमुख असतात मेजर जॉन स्मिथ आणि लेफ्टनंट मॉरिस शेफर. जर्मन सैन्याच्या कडेकोट पहाऱ्यातून, अनेक संकटांचा सामना करत हे पथक जनरल कार्नेबीची कशी सुटका करते, हे या चित्तथरारक कादंबरीत वाचायला मिळते. मूळ कादंबरीचे कथाबीज अप्रतिम आहेच, माधव कर्वे यांनी केलेला अनुवादही तितकाच सुरस आहे. आपल्या स्मृतिकोशात 'व्हेअर...' चित्रपट आहेच. कादंबरी वाचताना त्याच्या पुन:प्रत्ययाचा आनंद नक्कीच मिळतो.

जगभरात उलथापालथ घडवणारी
जबरदस्त कादंबरी

९वी आवृत्ती




द दा विंची कोड


डॅन ब्राऊन

अनुवाद : अजित ठाकूर

किंमत : ४००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

## नवी संहिता... नवा आशय...

उद्योजक असलेल्या 'सीईओं'च्या प्रेरणादायी कथा





# शाइन ब्राइट

**रश्मी बन्सल**

अनुवाद : **मुक्ता देशपांडे**

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

मानसिक आरोग्य, अस्वस्थ्याची लाज, लांच्छनाची भीती
आणि मौनाचे कुंपण यांच्यावर मात करून केलेले संक्रमण




# आयुष्याचा नवा डाव


**शैलजा सेन**

अनुवाद : **सरिता आठवले**

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय

**TBC-30 Book No. 3**




# ओरिजिन

लेखक : **डॅन ब्राऊन**

अनुवाद : **मोहन गोखले**

'ओरिजिन' ही एकाच वेळी कल्पक आणि अस्वस्थ करणारी गोष्ट आहे. यातील विज्ञान अचूक, सहज समजेल असे आहे आणि यात उल्लेखिलेल्या ऐतिहासिक इमारतींची माहिती अत्यंत चित्तवेधक आहे.

– आयरिश इन्डिपेंडन्ट

आपण कोण आहोत? आणि आपण कुठे चाललो आहोत, या प्रश्नांची उत्तरं शोधल्याचा दावा एडमंड कर्ष करतो. कॉम्प्युटर शास्त्रज्ञ, गेम थिअरिस्ट, संशोधक आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील एक भविष्यवेत्ता अशी त्याची ओळख असते. त्याने असा काहीतरी शोध लावला आहे आणि तो शोध तो नाट्यमय रीतीने जगासमोर आणणार आहे, असं सूतोवाच तो तीन प्रमुख धर्मगुरूंसमोर (बिशप वाल्डेस्पिनो, राब्बी कोव्हज, अल्लामा ऊर्फ सैयद अल फदल) करतो. त्याचा हा शोध धर्मवाद्यांना कदाचित अडचणीत आणणारा असतो किंवा जगभर खळबळ माजवणारा असतो. त्याचं हे सूतोवाच अर्थातच या धर्मगुरूंना अस्वस्थ करतं. कर्षला तो शोध जगासमोर आणण्यापासून रोखलं पाहिजे, असं त्यांना वाटायला लागतं; पण कर्षच्या आणि त्या तीन धर्मगुरूंच्या भेटीनंतर सैयद अल फदल यांचा गूढ रीतीने मृत्यू होतो. त्यानंतर बिलबाओ येथील गुगेनहाइम वस्तुसंग्रहालयात एका संध्याकाळी एडमंड कर्षने बऱ्याच लोकांना आमंत्रित केलेलं असतं. तिथे तो मानवाच्या उत्पत्तीसंबंधी आणि मानवाच्या भविष्यासंबंधी त्याने लावलेला शोध जगासमोर आणणार असतो. आमंत्रितांमध्ये त्याचे गुरू रॉबर्ट लँग्डन यांचाही समावेश असतो.

कर्षचा शोध काय असेल, याबद्दल जगभरात उत्सुकता असते. लँग्डन आमंत्रणाप्रमाणे कार्यक्रमस्थळी, म्हणजे त्या वस्तुसंग्रहालयात पोचतात. तिथे विन्स्टन नावाचा संगणक ध्वनियंत्राद्वारे त्यांच्या संपर्कात असतो. ॲम्ब्रा व्हिडाल, ही वस्तुसंग्रहालयाची मुख्याधिकारी प्रात्यक्षिकाविषयी प्रास्ताविक करते. ते प्रात्यक्षिक संपूर्णपणे संगणक नियंत्रित असतं. तसेच, संपूर्ण जगभरात त्याचं एकाच वेळी प्रक्षेपण सुरू असतं. त्या प्रात्यक्षिकाचा काही भाग पार पडतो. कर्ष त्या शोधाबद्दल बोलणार असतो आणि...अचानक कोसळतो. त्याचा खून झालेला असतो. कार्यक्रमस्थळी एकच हलकल्लोळ माजतो. ॲम्ब्रा व्हिडाल ही स्पेनचे भावी राजे ज्युलियन यांची वाग्दत्त वधू असते. त्यामुळे कार्यक्रमस्थळी तिच्या संरक्षणासाठी फोन्सेका हा दरबारी सुरक्षा व्यवस्थेतील एजंट आणि डायस नावाचा त्याचा सहायक असतो. जगभरात या कार्यक्रमाचं प्रक्षेपण सुरू असल्यामुळे एडमंडच्या खुनाची घटना विश्वभरातील लोकांनी बघितलेली असते. कर्षच्या हत्येनंतर धर्मगुरू

राब्बी कोव्हज यांचाही गूढ रीतीने मृत्यू होतो.

स्पेनचं राजघराणं धर्मपरायण असतं. शिवाय ॲम्ब्राचा कर्षच्या प्रात्यक्षिकातील सहभाग ज्युलियनना मान्य नसतो. त्यामुळे ज्युलियन तर कर्षच्या खुनामागे नाहीत, असा संशय ॲम्ब्राच्या मनात निर्माण होतो. अव्हिला नावाच्या माजी नौदल अधिकाऱ्याने कर्षचा खून केला आहे, हे स्पष्ट होतं; पण अव्हिला निसटतो. ॲम्ब्राने अगदी शेवटच्या क्षणी अव्हिलाचं नाव निमंत्रितांच्या यादीत घातलेलं असतं, त्यामुळे संशयाची सुई तिच्याकडेही जाते. खुनाची घटना कळल्यानंतर राजपुत्र ज्युलियन ॲम्ब्राशी मोबाइलवर संपर्क साधू पाहत असतात. फोन्सेका तिला वारंवार ज्युलियनशी बोलायला सांगत असतो; पण ॲम्ब्रा टाळत असते. फोन्सेका आणि डायस, ॲम्ब्रा आणि लँग्डनना माद्रिद येथील राजवाड्यात घेऊन जाऊ इच्छितात; पण कर्षच्या खुनातील संशयित म्हणून लँग्डनना बंदीवासात टाकलं जाईल, अशी ॲम्ब्रा आणि लँग्डन या दोघांनाही भीती असते. त्यामुळे ते घटनास्थळावरून पलायन करतात.

दरम्यान, कर्षचा मोबाइल लँग्डनच्या हाती लागलेला असतो. त्या मोबाइलवरून लँग्डनच्या लक्षात येतं की ज्या शोधाचं प्रात्यक्षिक कर्ष दाखवणार असतो, ते प्रात्यक्षिक त्याच्या घरातील संगणकात सुरक्षित असतं; मात्र त्याचा पासवर्ड म्हणजे कवितेची एक ओळ असते. तो पासवर्ड शोधून त्या प्रात्यक्षिकापर्यंत पोचण्याचा आणि त्याचा शोध जगासमोर आणण्याचा लँग्डन आणि ॲम्ब्रा चंग बांधतात. कर्षने तयार केलेला विन्स्टन नावाचा संगणक त्यांच्या मदतीला असतोच. कर्षच्या निवासस्थानी जाऊन लँग्डन आणि ॲम्ब्रा पासवर्ड शोधत असतात.

इकडे माद्रिदच्या राजवाड्यामध्ये ॲम्ब्रा व्हिडाल आणि लँग्डन यांच्या पलायनामुळे खळबळ माजलेली असते. कॉन्स्पिरसी नेट.कॉम घडत असलेल्या घटनांचा वृत्तान्त थोड्या थोड्या वेळाने प्रसारित करत असते. एका बातमीपत्रात त्यांनी असं सांगितलेलं असतं, की लँग्डन यांनी ॲम्ब्राचं अपहरण केलं आहे. या बातमीमुळे लँग्डन यांचा जीव धोक्यात येतो. कर्षच्या निवासस्थानाबाहेर पोलीस ॲम्ब्राची सुटका करायला आणि लँग्डनना अटक करायला आलेले असतात; पण आत जाण्याचा मार्ग त्यांना सापडत नसतो. ऐन वेळेला कर्षच्या गच्चीवर फोन्सेका आणि डायस हेलिकॉप्टर घेऊन

येतात. ॲम्ब्रा आणि लँग्डन हेलिकॉप्टरमध्ये बसतात.

फोन्सेका आणि डायस त्यांना राजवाड्यात घेऊन जाऊ इच्छितात; पण लँग्डन त्यांना तसं न करण्याची विनंती करतात. लँग्डन यांच्या सांगण्यावरून हेलिकॉप्टर सॅग्राडा फॅमिलिया चर्चमध्ये नेलं जातं, जिथे लँग्डनना कर्षच्या संगणकाचा पासवर्ड सापडणार असतो. त्या चर्चमधील फादर बाना, ॲम्ब्रा आणि लँग्डनना चर्चच्या तळघरात घेऊन जातात. फोन्सेका आणि डायस बाहेर उभे असतात. त्या वेळी अव्हिला तिथे येतो आणि डायस, फोन्सेकाला ठार मारतो. लँग्डन यांच्यावरही तो हल्ला करतो; पण त्या दोघांच्या झटापटीत अव्हिला ठार होतो. ॲम्ब्रा आणि लँग्डनच्या शोधार्थ या चर्चपर्यंतही पोलीस पोचलेले असतात; पण फादर बानांच्या सहकार्यामुळे इथूनही लँग्डन आणि ॲम्ब्रा निसटतात. आता त्यांना कर्षच्या महासंगणकाचा पासवर्ड सापडलेला असतो. ज्या प्रयोगशाळेत तो महासंगणक असतो, ती प्रयोगशाळा ते दोघं शोधून काढतात. ज्याद्वारे कर्ष त्याचा शोध जगासमोर आणणार असतो.

दरम्यान, राजवाड्यात प्रचंड उलथापालथी सुरू असतात. दरबारी सुरक्षा रक्षकांच्या दलाचा प्रमुख दियागो गार्झा याला, एडमंड कर्षच्या खुनातील त्याच्या सहभागाबद्दल, तसेच या गुन्ह्यामध्ये बिशप वाल्डेस्पिनोंना गोवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल अटक केल्याची घोषणा राजवाड्यातील जनसंपर्क अधिकारी मोनिका मार्टिन प्रसारमाध्यमांसमोर करते. राजपुत्र ज्युलियन आणि बिशप वाल्डेस्पिनो राजवाड्यातून गूढ रीतीने नाहीसे झालेले असतात. इकडे लँग्डन आणि ॲम्ब्रा कर्षच्या महासंगणकापर्यंत पोचतात आणि एडमंडचा तो शोध त्याच्या आणि अन्य तज्ज्ञांच्या निवेदनातून जगभरात पोचवण्यात यशस्वी होतात.

जगाच्या उत्पत्तीविषयी कर्षने काय सांगितलेलं असतं? राजपुत्र ज्युलियन आणि वाल्डेस्पिनो कुठे गेलेले असतात? ॲम्ब्रा आणि ज्युलियन यांची भेट होते का? त्यांच्यातील गैरसमज दूर होतो का? कर्षचा खून करण्याची सुपारी अव्हिलाला कुणी दिलेली असते? कमांडर गार्झाची कैदेतून सुटका होते का?...जाणून घेण्यासाठी 'ओरिजिन' वाचलीच पाहिजे.

## पुस्तक परिचय




# आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी

■

लेखक : **सुधा मूर्ती**

अनुवाद : **लीना सोहोनी**

■

भारतातील एक लोकप्रिय लेखिका सुधा मूर्ती यांच्या लेखणीतून यापूर्वी उतरलेल्या ‘आजीच्या पोतडीतील गोष्टी’च्या मालिकेतील पुढचं पुस्तक म्हणजे ‘आजी-आजोबांच्या पोतडीतील गोष्टी.’

‘आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी’ हा एकूण एकोणीस कथांचा संग्रह आहे. लॉकडाउनच्या काळात आजी-आजोबांच्या शिग्गवी या गावी आजोबांची बहीण तिच्या नातीसह आली आहे आणि त्यांची अन्य नातवंडंही आली आहेत. ही नातवंडं मास्क शिवण्यात मदत करणं, घरातील वेगवेगळ्या कामांची जबाबदारी उचलणं, गावात थोड्या दिवसांसाठी आश्रयाला येऊन गावच्या मंदिरात राहणाऱ्या गरीब मजुरांना देण्यासाठी जेवण तयार करण्यास हातभार लावणं हे सगळं तर करतच आहेत; पण एकीकडे आजी-आजोबांकडून छान छान गोष्टीही ऐकत आहेत.

‘भाताचं आणि मुलांचं आगमन’ या कथेत आजी गोष्ट सांगते भाताची. माधव नावाचा एक माणूस एकदा स्वर्गात जातो आणि तिथे त्याला भेटते अन्नपूर्णा देवी. ती त्याला भात खाऊ घालते आणि त्याला तो खूप आवडतो. मग माधव पृथ्वीवर भात (तांदूळ) कसा घेऊन येतो, त्याची ही कथा आहे.

‘गव्हाचं जग’ ही कथा आहे अरुण नावाच्या शूर तरुणाची. अरुण सर्पांच्या दुनियेत पोचतो आणि तिथून गहू घेऊन येतो.

‘जादूच्या बिया, जग्गू आणि घेवड्याचं झाड’ ही अनिता आणि जग्गू या जोडप्याची कथा आहे. अनिता खूप कष्टाळू, तर जग्गू आळशी. अनिता शेतात पिकणाऱ्या भाज्या बाजारात नेऊन विकत असते; पण पैसा फार मिळत नसतो. एकदा एक म्हातारा तिला घेवड्याची बी देतो. अनिता ती बी शेतात पेरते. त्या बीमधून उगवलेल्या झाडाला घेवड्याच्या खूप शेंगा लागतात आणि त्यांच्या विक्रीतून अनिताला चांगले पैसे मिळायला लागतात. लोभी जग्गू अनिताला म्हणतो, की त्या म्हाताऱ्याकडून आणखी बिया आण; पण अनिता नकार देते. जग्गूचा लोभ कसा वाढत जातो, तो त्या घेवड्याच्या उंचच उंच झाडावर चढून एका अज्ञात शक्तीकडे काय काय मागतो, शेवटी त्याला काय धडा मिळतो, याची ही कथा.

‘प्रारब्धाची देवता’ ही महेश या गरीब, पण परोपकारी माणसाची कथा आहे. दारिद्र्याला कंटाळलेला महेश त्याला स्वप्नात मिळालेल्या संकेतानुसार धन प्राप्त करण्यासाठी प्रारब्धाच्या देवतेकडे जायला निघतो. वाटेत त्याला थकलेले दोन घोडे भेटतात, त्यांना चरायला कुरण नसतं, पुढे त्याला आंब्याचं वठलेलं झाड भेटतं, इतर झाडांप्रमाणेच त्याला फळं

यावीत, अशी त्याची इच्छा असते, एका सुकलेल्या तळ्याकाठी काही पक्षी त्याला भेटतात. ते तळं पाण्याने भरावं अशी त्यांची इच्छा असते. प्रारब्धाची देवता भेटल्यावर या रस्त्यात भेटलेल्या सगळ्यांच्या मागण्या महेश तिला सांगतो; पण तो स्वत: धनवंत होतो की नाही?

'भावंडांची गोष्ट' या कथेतील अवंती नगरीचा राजा एकदा रपेटीला गेलेला असताना त्याला एक सर्पाच्या आकाराचा दगड सापडतो. तो दगड वेगळा आणि विलक्षण वाटल्यामुळे राजा तो राजवाड्यात घेऊन येतो आणि राणीकडे सोपवतो. राणी तो दगड एका पेटीत ठेवते. एकदा राजा-राणी ती पेटी उघडतात तर त्यातून एक देखणा राजकुमार बाहेर येतो. तो राजकुमार स्वत:ची ओळख त्यांना सांगत नाही; पण त्यांच्यावरील संकटांचं निवारण करतो. राजकन्या त्याच्या प्रेमात पडते आणि त्याच्याशी विवाह करते; पण एके दिवशी ती राजकुमाराच्या आई-वडिलांविषयी विचारते; तेव्हा तो म्हणतो की, मी ते सांगू शकत नाही. त्याच मुद्द्यावरून राजकन्या हट्टाला पेटल्यावर राजकुमार जलसमाधी घेतो. पुढे काय होतं?

'मूठभर धान्य' या कथेतील चंपा आपल्या आई-वडिलांबरोबर राहत असते. तिच्याकडे मिनी नावाचं एक उंदराचं पिलू असतं. एकदा चंपाची आई तिला चुलीसाठी लाकडं आणायला सांगते. चंपा लाकडं आणायला जाते तर ती लाकडं भिजलेली असतात. उन्हाळ्यातही लाकडं भिजलेली पाहून चंपाला आश्चर्य वाटतं. मग एक लाकडाचा ओंडका चंपाशी बोलायला लागतो. बागेत वाढलेल्या गवतामुळे तो ओला असतो, सूर्यकिरण गवतापर्यंत पोचत नाहीत, म्हणून गवत ओलं असतं, सूर्याच्या आड ढग येत असतात, ढगाला सूर्याच्या मार्गात वाऱ्याने ढकललेलं असतं, राजाने राजवाड्याची सर्वांत उंच खिडकी बंद ठेवल्यामुळे वारा अडलेला असतो, राजाला खिडकी उघडायला राणीची परवानगी नसते, राणी तिच्या पाळीव पोपटाकडून गोष्टी ऐकण्यात दंग असते, पोपट एका जलदेवतेच्या भीतीने राजवाड्यात आला आहे, जलदेवतेला एका हत्तीचं भय वाटतं आहे, हत्तीला सर्पाची भीती वाटते आहे, सर्पाला एका कुंभाराकडून धोका आहे आणि कुंभाराच्या घरात लपलेल्या उंदराला तांदळाचे दाणे हवे आहेत...चंपा ही साखळी कशी तोडते?

'उंदराचा परत झाला उंदीर' ही कथा आहे एका उंदराची. एका ऋषींच्या आश्रमात एक उंदीर आला. त्याला मांजरापासून संरक्षण हवं होतं. ऋषींनी त्याला आश्रमात राहायला सांगितलं; पण उंदराने ऋषींना विनंती केली की ऋषींनी त्याला मांजर करावं. ऋषींनी त्याला मांजर केलं, त्यानंतर प्रत्येक वेळेला उंदराच्या विनंतीवरून त्यांनी त्याला कुत्रा, सिंह, मुंगी, साप, माणूस अशी रूपं दिली. मग तो परत उंदीर का झाला आणि ऋषींनी त्याला काय सांगितलं?

'क्वारंटाइनचे चाळीस दिवस' या कथेतील अनमोल या गरीब, अनाथ मुलाला दीपक नावाचा माणूस त्याच्या गावी घेऊन जातो. चाळीस दिवस तो अनमोलला काहीही काम न करता फुकट जेवायला घालतो. चाळीस दिवस झाल्यावर त्याला एका अरण्यात घेऊन जातो. तिथे त्याला एका मोठ्या थैलीत शिरायला भाग पाडतो, ज्या पिशवीतून अनमोलचं फक्त डोकं बाहेर असतं आणि त्या पिशवीभोवती दीपकने मांसाचे तुकडे लावलेले असतात. त्या तुकड्यांसाठी एक प्रचंड गरुड त्या थैलीपाशी येतो आणि अनमोलसकट ती थैली उचलून तिथल्या उंच, निमुळत्या टेकडीवर नेऊन ठेवतो. जसजसा तो गरुड मांसाचे तुकडे खात असतो, तसतशा त्या थैलीच्या गाठी सुटतात आणि अनमोल थैलीतून बाहेर येतो. त्या टेकडीवर खूप जडजवाहीर, हिरे, माणकं, मोती असतात. ते वेचून टेकडीवरून खाली टाक, असं दीपक अनमोलला सांगतो. मांसाचे तुकडे संपल्यावर तो गरुड आपल्याला खाऊन टाकेल, या भीतीने अनमोल गर्भगळीत झालेला असतो; पण दीपक त्याला सांगतो की, टेकडीवरची हिरे-माणकं त्याने खाली टाकली, की तो त्याला टेकडीवरून खाली उतरण्याचा मार्ग सांगेल. दीपकच्या सांगण्याप्रमाणे काही जड जवाहिर, हिरे, माणकं खाली टाकल्यावर अनमोल दीपकला खाली येण्याचा मार्ग विचारतो, तेव्हा दीपक त्याला, त्या टेकडीच्या मागे एक नदी आहे त्या नदीत उडी मारायला सांगून तिथून निघून जातो. काय करतो मग बिचारा अनमोल? दीपकला त्याच्या कृत्याची शिक्षा मिळते का?

'नशिबाचा याच्याशी काय संबंध?' ही कथा रवी नावाच्या शेतकऱ्याची आहे. पावसाच्या बेभरवशीपणामुळे रवीला मिळणारं उत्पन्नही बेभरवशीच असतं. त्यामुळे त्याची बायको अलका नाराज असते. ती त्याला ज्योतिषी


व्हायचा वारंवार आग्रह करत असते; पण ज्योतिष्याचा काहीही अभ्यास नसताना ज्योतिषी होणं त्याला पटत नसतं; पण अलका त्यासाठी त्याचा सारखाच पाठपुरावा करते, तेव्हा तो नाईलाजाने ज्योतिषी होतो. एक बाई त्याच्याकडे अंगठी हरवली आहे, असं सांगत येते. त्या वेळेला रवी मनाशी 'काडेपेटी' असं काही तरी पुटपुटतो आणि ती बाई निघून जाते. तिला तिची अंगठी काडेपेटीत सापडते. हा केवळ योगायोग आहे, हे रवीला माहीत असतं. त्यामुळे हे ज्योतिषाचं सोंग पुढे चालू ठेवणं त्याला नको वाटतं. तरीही अलकाच्या हट्टापायी तो परत ज्योतिष सांगायला बाजारात जाऊन बसतो. त्याच रात्री राजाच्या खजिन्यातून हिऱ्या-मोत्यांच्या चाळीस पेट्या गायब होतात. राजवाड्यातील एक सरदार रवीला राजाकडे घेऊन जातो. राजा त्याच्यावर चोरांचा ठावठिकाणा सांगण्याची जबाबदारी सोपवतो. राजासमोर आल्यामुळे गांगरलेला रवी 'चाळीस चोरांनी चाळीस पेट्या नेल्या' असं काही तरी पुटपुटतो. त्या चाळीस चोरांचा ठावठिकाणा सांगण्यासाठी रवी चाळीस दिवसांची मुदत मागून घेतो. त्या चाळीस दिवसांत जर रवीने चोरांचा ठावठिकाणा सांगितला नाही तर राजा त्याला कारागृहात टाकणार असतो. रवीला चोरांचा ठावठिकाणा सांगता येतो का?

तर वाचकांना खिळवून ठेवणाऱ्या, रंजनाबरोबरच बोध देणाऱ्या काही कथांची ही झलक आहे. अन्य नऊ कथाही अशाच खिळवून ठेवणाऱ्या, मनोरंजक, बोधप्रद आहेत.



‘मराठी ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवर्तक’ वाङ्‌मयाच्या इतिहासातून डॉ. आनंद यादव यांच्या ग्रामीण साहित्यिक कर्तृत्वाची घेतलेली नोंद

**२री आवृत्ती**






# डॉ. आनंद यादव

## – एक साहित्यिक प्रवास

संपादक : **डॉ. कीर्ती मुळीक । श्री.अप्पासाहेब जकाते यादव**

---

**किंमत : ४००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

मेंदूशास्त्रातील तज्ज्ञ संशोधिकेने स्वतःच्याच मेंदू विकाराशी दिलेली कडवी झुंज!

**आवर्जून वाचावे**




# माय स्ट्रोक ऑफ इन्साइट

**डॉ. जिल बोल्त टेलर**

अनुवाद : **डॉ. दिगंबर बेहेरे**

---

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

अभिप्राय

# चिकन सूप फॉर द सोल





जॅक कॅनफिल्ड आणि मार्क हॅन्सन या अमेरिकेतल्या सर्वप्रिय, सुप्रसिद्ध अशा दोन वक्त्यांनी मिळून संकलित केलेल्या या कथा जगाच्या कानाकोपऱ्यातल्या जनमानसाच्या मनाला जाऊन भिडल्या आहेत, भावल्या आहेत. या कथांमधील आशावाद, बुद्धिवाद तुम्हाला येणारं नैराश्य झटकून टाकायला मदत करेल. अतिशय विचारपूर्वक निवडलेल्या या कथा म्हणजे 'अशक्य' शब्दप्रयोगाला झुगारून देऊन आपल्या आयुष्याचा मार्ग उजळून टाकणाऱ्या आहेत. जेव्हा कधी तुम्हाला तुमचा मुद्दा ठामपणे मांडावासा वाटेल, एखाद्या मित्र-मैत्रिणीला स्फूर्ती द्यावीशी वाटेल किंवा लहान मुलाला शिकवण द्यावीशी वाटेल, तेव्हा या पुस्तकातील अनेक हृदयस्पर्शी कथांचा हा ठेवा नक्कीच उपयोगी पडेल... लोक फार वाईट वागतात...! जिकडे बघावं तिकडे निराशाजनक चित्र दिसत असतं. चांगलं असं काही घडतच नाही का?

सगळीकडेच परिस्थिती कशी खराब झाली आहे नाही? असे उद्‌गार वेळोवेळी आपल्याला ऐकायला मिळतात. कधी कधी आपणही त्याच सुरांत सूर मिळवतो. हे उद्‌गार अगदीच निरर्थक असतात असं नाही; पण वाईटाबरोबरच जगात थोडं का होईना चांगलंही घडतं आहेच की! चांगलंही वागणारी, विधायक कामं करणारी माणसंही आहेतच की! आपल्याला अनेक वेळा माणुसकीचे सुखद अनुभव येत असतात. अशादायक असं काहीतरी घडतंय असं जाणवतं. कधी कधी एखादी अगदी सामान्य व्यक्ती देखील अशी काहीतरी असामान्य, अद्‌भुत कृती करून दाखवते की जी आदर्श ठरावी. जिच्यापासून सर्वांनी बोध घ्यावा- शिकावं असं तीव्रतेनं वाटत. आजच्या ताणतणावाच्या, हिंसेच्या, दहशतवाद-द्वेषानी भरलेल्या जगात गरज कशाची आहे तर- प्रेमाची, परोपकाराच्या भावनेचं पुनरुत्थान करण्याची! पाश्चिमात्य व पौर्वात्य देशातील अनेक सामान्य (क्वचित सुप्रसिद्ध) व्यक्तींनी असंच काहीतरी जगावेगळं करून दाखवलंय जे सगळ्यांच्याच मनाला भावण्यासारखं आहे. अशा या सत्यकथा `Chicken Soup for the Soul' ह्या Best Sellers च्या यादीतील इंग्रजी पुस्तकांतून १९९२मध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. याचे पुढील भाग Second, Third, Fourth Serving of Chicken Soup for the Soul या शीर्षकाखाली मराठी भाषांतरही खूप सुंदररीत्या केलेलं आहे. इंडियन सोल, मदर्स सोल ही पुस्तके अजून वाचनीय आहेत.

**– ममता मुनगीलवार**

# छंद बागेचा

आप्तस्वकीयांचा अकाली मृत्यू, व्यवसायातील अपयश, अपेक्षाभंग, सेवानिवृत्ती नंतरचे रिकामेपण आदी कारणांमुळे आलेले नैराश्य या समस्येची उकल करणारे सलग सहा पुस्तक परिचय करून दिल्यानंतरही, समस्या निवारणाचा अजूनही एक पर्याय सुचवू इच्छितो तो म्हणजे, आपल्या आवडीच्या एखाद्या छंदात गुंतून राहणे. सेवानिवृत्तीनंतर मी बागकामात गुंतवून घेतल्यामुळे, बागकाम संदर्भातीलच एखाद्या पुस्तकाचा परिचय करून देऊन या अभियानातील माझ्या सहभागाची सांगता करण्याचे ठरविले. या




संदर्भातील बरीच पुस्तके वाचली होती; पण आजवर परिचय करून दिलेल्या पुस्तकांच्या तुलनेत ती फारशी भावली नाहीत. शेवटी आपल्या ग्रूपवरील, या क्षेत्राशी निगडित असलेल्या बावचकर सरांशी संपर्क साधला, त्यांनी संगितल्यावरून हे पुस्तक लॉकडाउनच्या काळात दस्तुतखुद्द लेखिकेकडूनच मिळविले. मी कृषी पदवीधर असल्यामुळे बागकाम या क्षेत्राची थोडीफार माहिती असली तरीही, सुनीती देशमुख यांचे 'छंद बागेचा' हे पुस्तक वाचल्यानंतर मात्र, मी आमच्याच बागेत किती चुका केल्या आहेत हे लक्षात आले. केवळ पुस्तकी ज्ञानावरच कोणत्याही क्षेत्रात लगेचच प्रावीण्य प्राप्त होत नसले तरीही, संबंधित विषयाची माहिती वाचून, त्या क्षेत्रात गोडी निर्माण केली तर आपण, अगदी राष्ट्रीय स्तरापर्यंत आपली ओळख निर्माण करू शकतो याचे उदाहरण म्हणजे या पुस्तकाच्या लेखिका. नोव्हेंबर २०१३मध्ये प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाची सुधारित तिसरी आवृत्ती २०१८मध्ये, मेहता पब्लिशिंग हाऊससारख्या नामांकित प्रकाशन संस्थेने प्रकाशित करूनही, हे पुस्तक कालपर्यंत मलाही परिचित नव्हते. कदाचित, लेखिकेचे बोन्साय (वामनवृक्ष), बोन्साय म्युरल, ट्रे लॅन्डस्केप, रॉक प्लांटिंग, पुष्परचना, इकेबाना, जपानी बगीचा आदीच्या कार्यशाळा, व्याख्याने आणि लेख हे फक्त, आर्थिक उच्च स्तरातील लोकांसाठीच आहेत असा गैरसमज करून घेतल्यामुळे हे झाले असावे. विशेष म्हणजे लेखिकेस, आपल्या घराभोवतालची बाग, तसेच वर नमूद केलेल्या सर्व नावीन्यपूर्ण प्रयोगासाठी, कैक वेळा मिळालेल्या पारितोषक वितरण समारंभात, विविध संस्थांनी दिलेल्या सन्मानपत्र सोहळ्यात प्रत्यक्ष हजर राहूनही माझ्याकडून हे घडले आहे. असो.

चार विभागांत विभागलेल्या या पुस्तकाच्या पहिल्या विभागात, बागेच्या इतिहासात, ज्यात बुद्ध, महावीर, रामायण,महाभारत काळातील पुष्पवाटिकांपासून शालिमार, मुघल गार्डन ते अद्ययावत बागांची माहिती, बागेची आखणी (ले -आउट) कशी असावी, लॉन, गच्चीवरील बाग, वॉटर फॉल, रोपवाटिका, अभिवृद्धी - कलम करून नवी रोपे बनविण्याची कला,

वॉटर गार्डन, किचन गार्डन, रॉक गार्डन, बागेत वापरायच्या हत्यारांचा परिचय (हा परिचय हत्यारे खरेदी करण्यापूर्वीच होणे आवश्यक आहे), हंगामी फुलझाडे, ऑर्किड, नेचे, इनडोअर प्लान्ट (सावलीतील बाग), शिंकाळी (हँगिंग्ज) तयार करणे, निवडुंग, शुष्क काष्ठ (ड्रिफ्ट वूड), तबक बाग (डिश गार्डन), बॉटल गार्डन आदी थोड्याफार ओळखीच्या किंवा अजिबात माहीत नसलेल्या विषयांची खूप सोप्या भाषेत माहिती सांगितली आहे. माझ्या मते हे पुस्तक इतक्याच माहितीसह, याच किमतीत, जरी मिळाले, तरीही, पैसे वसूल झाले असे म्हणता आले असते.

दुसऱ्या विभागात लेखिकेच्या आवडत्या-बोन्साय, बोन्साय म्युरल, ट्रे लॅन्डस्केप, रॉक प्लांटिंग, ट्रे वॉटर गार्डन या विषयाची सविस्तर माहिती आहे. लक्षपूर्वक आणि चिकाटीने करायचे हे काम एकदा जमले की तुम्ही या क्षेत्रातील मास्टर झालात असे समजायला हरकत नाही.

तिसऱ्या विभागात - पुष्परचना, इकेबाना, पाश्चिमात्य/ भिंतीवरील/ पाण्यावरील पुष्परचना काळजीपूर्वक समजावून घेऊन करू लागलात की हाच छंद व्यवसाय म्हणूनही जमून जाईल.

चौथ्या विभागात- पर्यावरणाचे ऱ्हासपर्व, औषधी वनस्पती, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचे दुष्परिणाम, गांडूळ खत निर्मिती, घराजवळ लावायचे वृक्ष, रोपवाटिका, बागेतील अवजारे आणि काही उपयुक्त माहिती तक्ते दिले आहेत. यां पैकी रोपवाटिका या व्यवसायास खूप स्कोप असून, जवळजवळ सर्व भारतात, विशेषतः, दक्षिण व पूर्व भारतात, लागणाऱ्या रोपांपैकी बहुतेक रोपे ही बंगरूळू परिसर आणि द.गोदावरी जिल्ह्यात तयार होतात.

थोडक्यात सांगायचे तर सार्वजनिक, व्यवसायभिमुख आणि घरगुती अशा बागेच्या तीन प्रकारांपैकी घरगुती बागेचे, फ्लॅटधारकांसाठी कुंडीतील, हँगिंग आणि गॅलरीतील बागकाम. रो हाउस, छोटी घरे असणाऱ्यांना, फ्लॅटधारकांचे सर्व प्रकार, शिवाय टेरेस गार्डन आणि घराभोवती जागा असणाऱ्यांसाठी वरील दोन्ही प्रकारांशिवाय परसबाग, कुंपण, मोठे वृक्ष लागवड आदींचा समावेश, असे तीन प्रकार पाडता येतील. या तिन्हीही प्रकारच्या घरात राहणाऱ्यांना हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. मी वाचलेल्या अशा आशयाच्या पुस्तकांत हे सर्वाधिक माहितीपूर्ण पुस्तक आहे.

पुस्तकातील माहितीच्या आधारे प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात करून, आपल्या अनुभवातूनच पूर्णत्वाकडे जाण्यासाठी याहून उत्तम हंगाम, वेळ असणार नाही. तसेच, या निमित्त कोरोना काळातील बंदीवासही सत्कारणी लागेल.

**– रमेश मोहिते**

०२

## चौघीजणी




चौघीजणी! मेग, ज्यो, बेथ आणि ॲमी या चौघी बहिणी, त्यांची कुटुंबवत्सल आई मिसेस मार्च आणि वडील मिस्टर मार्च! शेजारी वृद्ध मिस्टर लॉरेन्स आणि त्यांचा नातू लॉरी, ही या पुस्तकामधील महत्त्वाची पात्रं. लेखिका शान्ता ज. शेळके यांनी अतिशय सुंदर अनुवाद केला आहे. पुस्तक वाचताना मनाची उत्कंठा इतकी वाढत जाते की आपणास पुस्तक सोडवत नाही. विचारांची दिशा सहजपणे चांगल्या, सत्य गोष्टी अंगीकारण्याकडे नेण्याचे सामर्थ्य या पुस्तकातील प्रत्येक व्यक्तिमत्त्वामध्ये आहे. सहज, सुंदर भाषेतून मनुष्यस्वभाव आणि घडणारी परिवर्तने आपणास इथे अनुभवायला मिळतात. वेगवगेवळ्या स्वभावाच्या, व्यक्तिमत्त्वाच्या, वयाच्या चार मुलींना योग्य-अयोग्याची नुसती जाणच नव्हे तर स्वतःतील वाईट वृत्ती दूर करून चांगली वृत्ती अंगीकारण्याचे वळण एक आई कशी सहजपणे त्यांना लावते, हे वाचताना पदोपदी प्रत्येक आईने हे पुस्तक वाचलेच पाहिजे असे मनात सतत येऊन गेले. मूळ लेखिका लुइसा मे अल्कॉट या वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी १८८८मध्ये निधन पावल्या. 'Little Women' हे पुस्तक त्यांचे वाङ्मयीन स्मारक होय. 'गेली शंभर वर्षे देशोदेशीच्या तरुण मुलामुलींना आपल्या मुग्ध शैशवाचे रमणीय चित्र या सुंदर पुस्तकात सतत पाहावयास मिळाले आहे आणि एका निर्मळ पण उदास आनंदाचा त्यांना त्यातून प्रत्यय आला आहे.' असं मत शान्ता शेळके यांनी नोंदवून ठेवलं आहे. भिन्न भिन्न स्वभावाच्या मार्च बहिणी वाचताना आपण सहजपणे त्या कुटुंबात दाखल होतो. वय जसे जसे वाढते तसतसे आपण

मुलांना हव्या त्या सवलती देतो, त्यांना सर्व सुखसोयी देऊन नकळत कुठेतरी काही गोष्टी चुकत जातो. बारा वर्षांच्या ॲमीपासून सोळा वर्षांच्या मेगपर्यंत ...आई ही वयाने वाढणाऱ्या लेकींना वयासोबत गुणांनी वाढवत आणि दोषांना कमी करत जे संस्कार देते...त्या मिसेस मार्चच्या विचारसरणीला आणि आईपणाला सलाम ! सण आला की आपण खरेदी करतो मुलांसाठी; पण हा विचार येतो का?... की या सणाला मुलांना त्यांचे स्वभावदोष स्वतःच कमी करण्यास शिकवून दुसऱ्यसाठी त्याग करण्यास शिकवावे? सुंदर केस कापून ज्यो वडिलांसाठी पंचवीस डॉलर पाठवते, तेव्हा ती म्हणते की पैशांसोबत मी हाही विचार केला की मला माझ्या केसांचा खूप गर्व होता...ते कापून मी जे वडिलांसाठी केले त्याने माझे गर्वहरण मीच स्वतः केले! ॲमी छोटी पोर, जिचे सर्वजण लाड पुरवत आणि जेव्हा ती आंटकडे राहण्यास जाते तेव्हा आंटच्या कुत्र्याचे केस साफ करणे, पोपटाचा पिंजरा साफ करणे, आंटला पुस्तक वाचून दाखवणे, दोन तास अभ्यास करणे, छोटी छोटी कामे करणे यात अगदी त्रासून जाते आणि विचार करते, आपली कोणास कदर नाही; मात्र नंतर कुठलीच अभिलाषा न करता सर्व गोष्टी मनापासून करते तेव्हा लक्षात येते की प्रत्येकजण वेगळा असतो, फक्त तो स्वीकारला की आयुष्य सोपे जाते. मिसेस मार्चला भय असते की श्रीमंत कुटुंबात गेल्यास मेगला श्रीमंतीचं, पार्ट्यांचं आकर्षण वाटून स्वतःच्या गरीब घराबद्दल वाईट वाटेल का? परंतु, मेग आपल्या आईचं भय खोटं ठरवते. ती आपल्या गरीब कुटुंबाशी बांधलेली राहते. प्रेम कसं असावं, मैत्री कशी असावी, जोडीदार कसा निवडावा, आकर्षण आणि प्रेम यामधील नाजूक संबंध कसा हाताळावा, याचं समर्पक चित्रण या पुस्तकात आहे. मुलींना स्वयंपाक का यावा याचं सहज सोपं उत्तर मिसेस मार्चने या पुस्तकात सांगितलंय. आपल्या मुलामुलींमधील कलागुणांना कसा वाव मिळावा, त्यांच्या अंगभूत कौशल्यांना कशी वाट करून द्यावी, वेगवेगळ्या स्वभावाच्या मुलांमध्ये एकजूट कशी निर्माण करावी, कौटुंबिक ऐक्य कसं टिकवावं, याचं जणू अप्रत्यक्ष मार्गदर्शनच हे पुस्तक करतं. वृद्ध लॉरेन्स आणि त्यांचा प्रेमळ नातू यांच्यातील नातं आणि मार्च कुटुंबाशी असलेला त्यांचा स्नेहबंध वाचकाला हळुवार करून जातो. जॉन-मेग हे पती-पत्नी आपल्यातीलच वाटतात. भरपूर प्रेम, आदर, दयाळू वृत्ती, प्रामाणिकपणा, सद्सदविवेकबुद्धी, त्याग आणि

सत्य ...या सर्व गोष्टींचे संस्कार आपल्या मुलांना आपणच देऊ शकतो, दुसरे कोणीच नाही, हे मला पुस्तक वाचताना प्रकर्षाने जाणवले. मोठेपणाच्या खोट्या गोष्टी, लालच, कठोरता, द्वेष ,घमेंड हे सर्व दुर्गुण आपणच मुलांपासून दूर ठेवू शकतो. पौगंडावस्था ते तारुण्य हा काळ आईचा परीक्षेचा काळ नव्हे तर खूप साऱ्या प्रेमाचा अतिउच्च काळ आहे, असे मला वाटून गेले. पदोपदी माझी आई, मी आणि भाऊ, माझी मुले आणि मी, पती असे नजरेसमोर राहत होते. खूप शिकवून गेल्या या चारचौघी मला. माझ्या अंत:करणाचा ठाव घेतला या व्यक्तिरेखांनी! आवर्जून वाचावं 'चारचौघी.' लेखिका आणि अनुवादिका दोघीही  आज या जगात नाहीत...नमन त्या दोघींना एका आईचे! धन्यवाद माझी बालमैत्रीण डॉ. शीतल काळेचे, जिने एवढे अप्रतिम पुस्तक मला दिले.

**– सौ. अर्चना पैके**

# झोंबी




शालेय अभ्यासक्रमात कदाचित नववीत किंवा दहावीत आनंद यादव यांच्या आत्मचरित्रातील काही भाग धडा म्हणून अभ्यासाला होता, तेव्हाच ही आत्मचरित्रात्मक कादंबरी वाचण्याची ओढ निर्माण झाली. वयाच्या एकविशीत पहिल्यांदा ही कादंबरी वाचली तेव्हा अनेकदा रडलो, वयाच्या चाळिशीत पुन्हा जेव्हा ही कादंबरी वाचली तेव्हाही डोळ्यांच्या कडा पाणावल्या; पण अनेक प्रसंगांत विषण्णता आणि असहाय्यता अनुभवली आहे. आनंद यादवांच्या 'झोंबी' या आत्मचरित्रात्मक कादंबरीपासून मराठी साहित्याचा एका वेगळ्या दिशेने प्रवास सुरू झाला हेच म्हणणे संयुक्तिक ठरेल. या आत्मचरित्राला महाराष्ट्रभूषण, महाराष्ट्र दैवत पु. ल. देशपांडे यांची प्रस्तावना लाभली आहे. यादवांच्या आत्मचरित्राचे 'नांगरणी' आणि 'घरभिंती' हे पुढचे भागही प्रकाशित झाले आहेत. झोंबीच्या अर्पणपत्रिकेत लेखक आनंद यादव, पु. ल. देशपांडे यांचा उल्लेख तीर्थरूप म्हणून का

करतात हे वाचकांना झोंबीचा पुढचा भाग 'नांगरणी' वाचल्याशिवाय कळणार नाही. पु.लं.नी 'बाल्य हरवलेले बालकाण्ड' असे झोंबीचे वर्णन केले आहे. आत्मचरित्र असूनही कुठेही आत्मप्रौढी जाणवत नाही. लेखकाने शिक्षणासाठी दारिद्र्याशी केलेली लढाई म्हणजेच 'झोंबी.' अनेकांनी गरिबी पाहिली असेल; पण दारिद्र्याचे चटके सोसत जीव जगत ठेवणाऱ्या एका पोराच्या हाती पाटी-पेन्सिल आल्यापासून ते मॅट्रिकची परीक्षा पास होईपर्यंत कराव्या लागणाऱ्या झोंबीची ही कहाणी वाचकाला अंतर्मुख करते. आनंद यादव यांचे वडील रतनू आणि आई तारा यांच्या विवाहाच्या वर्णनापासून कादंबरीची सुरुवात होते. रतन आठ-दहा वर्षाचा तर तारा एक वर्षाची. विवाहाचे वर्णन करताना लेखक लिहितात, 'एक वर्षाच्या ताराच्या गळ्यात बांधलेलं काळ्याभोर मण्यांचं मंगळसूत्र, डोरलं मोठं चमत्कारिक दिसत होतं. चिमुरड्या पोरीचा कुंकू मळवट भरला होता. मंगळसूत्र घातलेला एक तांब्या धरून रतनची एकट्याचीच घोड्यावरून वरात निघाली, एक वर्षाची पत्नी इकडे पाळण्यात गाढ झोपी गेली. तिला यातलं काहीही माहीत नव्हतं. तिकडे तिची नियती परस्पर ठरवली जात होती. सासू-सासरे, विहीणबाई आपली हौस भागवून घेत होते' काय हे वर्णन! लेखकाची आई तारा सात-आठ वर्षांची झाल्यानंतर सासरी नांदावयास (राहायला) आली तेव्हा तिच्यावर होणारे अत्याचार वाचताना वाचक दुःखी होतो आणि असहाय्यता अनुभवतो. ताराची आई म्हणजेच लेखकाची आजी लवकरच गेली, तिला तेव्हा एक वर्षाचा मुलगा होता. आनंद यादवांनी शिक्षणासाठी भोगलेल्या व्यथा या कादंबरीत आहेतच; पण त्यासोबतच ग्रामीण जीवन, अशिक्षितपणा, दारिद्र्य, केवळ मार देणे म्हणजे शिकवणे असे मास्तरांचे स्वभाव याचे वर्णन आहे. या वर्णनासोबत आईवर होणारे अत्याचार, त्याबद्दल लेखकाची असहायता, शिकणं म्हणजे चैन आणि ती दारिद्र्यात कशी काय परवडणार म्हणून वडिलांनी लाथाबुक्क्यांनी मारणे, पुन्हा आईला होणारी अनेक मुलं आणि त्या मुलांचे अपमृत्यू, गावातल्या जत्रा, उरूस याचे वर्णन या कादंबरीत आहे. आपल्या दारिद्र्याचे, हालअपेष्टांचे शिक्षणासाठी घेतलेल्या मेहनतीचे कुठेही भांडवल करण्याचा लेखकाचा हेतू नाही. आपल्याला सहानुभूती मिळावी हासुद्धा लेखकाचा हेतू कुठेही जाणवत नाही. ग्रामीण भाषेतील काही शब्द शहरी वाचकांना नवीन असले, तरीही वाचक या

कादंबरीत रंगून जातो. वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य आनंद यादव यांच्या लेखणीत आहे. ज्या बाल्यावस्थेत वडिलांचे प्रेम, आईची माया अनुभवायची असते त्या वयात यादवांनी उपरेपणा अनुभवला आहे. शिक्षणासाठी, पुस्तकांच्या वाचनाच्या गोडीपाई कधी कधी लेखकाने लहानसहान चोरी केल्याचा उल्लेख कुठलाही आडपडदा न ठेवता लेखकाने केला आहे. वडिलांचा शिक्षणाला टोकाचा विरोध, म्हणून घर सोडून कोल्हापुरात गेले तेव्हा पोट भरण्यासाठी प्रसंगी त्यांना हरभऱ्याचा पाला आणि लोकांनी कचराकुंडीत टाकलेल्या केळीच्या सालींवर  गुजराण करावी लागली; पण तरीही शिकण्याची तळमळ कायम राहिली आणि त्यातूनच आनंद यादव घडत गेले. दहावीचा फॉर्म भरण्यासाठी लेखकाची तगमग, त्यासाठी जमवलेले ३५ रुपये, त्यासाठी एका मास्तरांनी केलेली मदत आणि शेवटी दहावीत मिळालेले उज्ज्वल यश.... आत्मचरित्राचा पहिला भाग संपतो. शिक्षणासाठी एवढ्या हालअपेष्टा सोसाव्या लागू शकतात. त्या सोसून, जिद्दीने दारिद्र्याशी झोंबून त्यावर मात करत आनंद यादवांसारखा एक ज्ञानी, ज्ञानयोगी कर्तबगारीने पुढे येतो आणि समाजाला दिशा देण्याचे, आपल्यासारख्या शोषितांचे जीवनमान सुधारण्याचे कार्य करतो. कादंबरी पूर्ण झाल्यावर वाचक नि:शब्द होतो.

**–डॉ. भूषण फडके**

# शिवपुत्र राजाराम




‘संताजी’ हे पुस्तक वाचल्यामुळे या पुस्तकात तेच असेल असं वाटलं होतं; पण पुस्तक छान लिहिलंय. उत्तरार्धात जास्त रंगत येते. जिंजी किल्ला सोडण्याची तयारी, नियोजन, हे खरंच इन्टरेस्टिंग आहे. त्या काळी मराठे आणि राजे परिवार किती अवघड परिस्थितीमधून गेले याची कल्पना येते. पुस्तक चांगलं आहे.

**– रवींद्र वाठोरे**

# द रेनमेकर




जॉन ग्रिशॅम यांच्या कादंबऱ्यांचं वैशिष्ट्य म्हणजे कथानायक एक वकील, जो न्यायव्यवस्थेला जिवंत ठेवण्याचं काम करतो. कधी मोठमोठ्या कंपन्यांपासून, उद्योगलॉबीपासून, राजकारणी, माफियांपासून तर कधी यांच्याशी हातमिळवणी करून सामान्य जनतेला न्यायापासून दूर ठेवणाऱ्या वकील फर्मपासून. यामध्ये हलाखीच्या परिस्थितीतून नुकताच वकील झालेला; परंतु कोणत्याच वकील फर्ममध्ये नोकरी न मिळालेला रुडी बेलर. त्याच्या हातामध्ये फक्त एकच केस. एक बलाढ्य इन्शुरन्स कंपनी, जी आपल्या विमाधारक डॉट ब्लॅक या महिलेच्या आजारी मुलाचा 'मेडिकल इन्शुरन्स क्लेम' नाकारते. परिणामी, त्या मुलाचा मृत्यू होतो. डॉट ब्लॅक, रुडी बेलर मार्फत त्या कंपनीवर नुकसानभरपाईचा दावा करते. यामध्ये बलाढ्य इन्शुरन्स कंपन्या कशा नियमबाह्यपणे विमाधारकांचे क्लेम नाकारून गडगंज नफा कमावतात, कदाचित कुणी कोर्टात गेल्यास त्याच्याबरोबर सेटलमेन्ट करतात, यातूनही कोर्टात केस उभी राहिल्यास विम्यापेक्षा जास्त पैसा मोठमोठ्या वकिलांवर खर्च करतात; परंतु क्लेम द्यायचा टाळतात, याचं वास्तववादी चित्रण लेखक डोळ्यांसमोर उभं करतो. सर्व सत्य परिस्थिती माहीत असूनही मोठमोठ्या वकील फर्म पैशासाठी, कायद्याच्या नावाखाली, कशी नैतिकता गुंडाळून ठेवतात हेही लेखक कसलाही आडपडदा न ठेवता स्वच्छपणे मांडतो. त्याचबरोबर रुडी बेलरचं समांतर आयुष्य, त्यातील चढ-उतार, स्वतःच्या इच्छा-आकांक्षा याही गोष्टी छानपणे मांडल्या आहेत. तसंच, यातील प्रत्येक व्यक्तिरेखेला योग्य न्याय दिल्याने त्याही मनात घर करून बसतात. मग तो त्याचा मित्र बेकर, कोर्टकेसमध्ये जीव तोडून मदत करणारा डेक, न्यायाधीश हार्वे हेल, किल्पर असोत की विरोधी वकील ड्रमंड असो की प्रेयसी केली रिकर. खरं तर, इन्शुरन्स, कायदे, कोर्ट केसेस म्हणजे अगदी रटाळ विषय; परंतु जॉन ग्रिशॅम इतक्या रोमांचक पद्धतीने मांडतात की पुस्तक हातातून अर्धवट बाजूला ठेवणं जिवावर येतं, इतकं हे उत्कंठावर्धक आहे. तर रुडी बेलर चमत्कार

करून, ही केस जिंकणार का आणि कशी? त्यासाठी तुम्हाला 'द रेनमेकर' हे पुस्तक वाचावं लागणार.

**–संदीप बडे**

## नाथ हा माझा




हे पुस्तक वाचायचे अनेक दिवस मनात होते, मुख्य करून 'आणि डॉ. काशिनाथ घाणेकर' पाहिल्यापासून जास्तच. या पुस्तकाचे अनेक जणांनी लिहिलेले परीक्षण वाचले असल्याने उत्सुकता होती. पहिले म्हणजे हे आत्मचरित्र नसून काशिनाथ घाणेकर जीवनात आल्यापासून ते त्यांच्या निधनापार्यंतचा कांचन यांचा प्रवास आहे. यामध्ये ना त्याआधीचा काळ रंगविलेला आहे ना त्यानंतरचा. हे वाचताना कळते की कांचन यांनी हे पुस्तक लिहिण्यापूर्वी लेख लिहिले होते. साहजिकच पुस्तकाची भाषा ओघवती असून, प्रसंग एकमेकांस जोडलेले आहेत. कांचन यांच्या आई याच क्षेत्रामध्ये असल्याने त्यांचे कुटुंब, आजूबाजूची माणसे ही चित्रपट क्षेत्राशी निगडित आहेत. या पुस्तकामध्ये त्या काळातील अनेक लोकप्रिय कलावंतांचा उल्लेख होतो, काही घटना सांगताना त्यांच्या स्वभावाचाही अंदाज येतो. हे दडपण लक्षात घेऊन काही प्रसंग उत्तम लिहिलेले आहेत. हे पुस्तक लिहिताना असे जाणवते की काशिनाथ यांच्या लहरी स्वभावामुळे खरे काशिनाथ वाचकांना नीट समजावे म्हणून लेखिकेने हे लिहिलेले असावे. आज काशिनाथ घाणेकर हे त्यांनी काम केलेल्या चित्रपटांमधून लक्षात राहिलेले आहेत. त्यांची नाटके पाहणारे आता वयस्कर किंवा दिवंगत आहेत; पण कांचन यांनी हे पुस्तक लिहिल्यामुळे (आणि त्यांच्यावरील चित्रपटामुळे) आपल्याला 'लोकप्रिय' असण्याचा खरा अर्थ समजतो; परंतु ही लोकप्रियता सहज पचवता येत नाही. तिच्याबरोबर गर्व आणि उन्माद येतो. शाळकरी कांचन स्वतःपेक्षा १५ वर्षांनी मोठ्या असलेल्या आणि लग्न झालेल्या माणसावर प्रेम करते. सारे काही माहीत असूनही, अगदी हा विवाह होणार नाही, हे देखील माहीत असताना केलेले एकतर्फी प्रेम ही या पुस्तकाची

सुरुवात आहे. डॉक्टरांची पहिली पत्नी इरावती ही डॉक्टर, देखणी होती. त्यांचा संसार तसा ठीक चालला होता. हा देखील प्रेमविवाहच होता. जर काशिनाथ यांना या विवाहापासून अपत्यप्राप्ती झाली असती (अनेक गर्भपात झाल्याचा उल्लेख आहे) तर हे चित्र दिसले नसते, असे वाटत राहते. काशिनाथ यांचे बायकोवर विसंबून राहणे आणि त्याच वेळी कांचनशी विवाह करण्याची अभिलाषा मनात ठेवणे, हे दोन दगडांवर पाय असल्यासारखे वाटते. डॉक्टर अत्यंत शीघ्रकोपी, आत्मकेंद्रित होते असं वर्णन पुस्तकामध्ये केलेलं आहे. शिवाय, त्यांची असंख्य प्रेमप्रकरणंही होती. हे सारे डॉक्टर मोकळेपणाने सांगत असत. कदाचित हे लिहिले नसते तर आज वाचणाऱ्या वाचकांना हे समजलेही नसते. पुस्तकामध्ये डॉक्टरांना लिहिलेली आणि इतरही काही पत्रे आहेत. कदाचित कांचन यांचा अशी संपूर्ण पत्रे देण्यामध्ये काही खास हेतू असावा. कांचन आणि काशिनाथ यांचं प्रेम, त्या प्रेमात उभे राहिलेले अडथळे, झालेला विरोध, सहन करावा लागलेला मनस्ताप आणि कांचनची भावनिक फरपट यांचं तपशीलवार चित्रण म्हणजे हे पुस्तक आहे. आई जरी चित्रपटाच्या कामासाठी घराच्या बाहेर असली तरी घराकडे तिचे लक्ष होते. असे असतानाही कांचन आणि काशिनाथ यांचे प्रेम कोणाच्याच लक्षात आले नाही. जेव्हा हे सर्वांना समजले तेव्हा त्यांनी विरोध केला. अनैतिक आणि बेकायदेशीर नात्यात कांचनला अडकू दिले नाही. इरावती यांनी घटस्फोट दिला तेव्हा रीतसर विवाह करून मगच पत्नी होण्यास त्यांनी संमती दिली. १२-१५ वर्षे घुसमट, फरपट सोसावी लागल्याने जेव्हा हा विवाह झाला तेव्हा अति आवड असूनही (वय जास्त झाल्याने) त्यांनी मूल होऊ न देण्याचा निर्णय घेतला. कांचन डॉक्टरांची अधिकृत, कायदेशीर पत्नी झाली, तरीही दहा दिवसांत त्यांच्या अतिरेकी वागण्याला कंटाळून आईकडे परत आली आणि पुढे डॉक्टरपण तिथेच राहायला आले. संसार व्हायचा होता तो असा झाला. अशा प्रकारे आईच्या छत्राखाली संसार थाटणे आणि डॉक्टरांचे अतिरेकी वागणं झेलणे, जे इरावतीबाईंनी इतकी वर्षं झेललं हे अपयशच आहे, असं वाटतं. हे पुस्तक वाचताना आपण कांचन यांच्या व्यक्तिगत आयुष्यात डोकावून पाहत आहोत आणि पुस्तक संपल्यावर आता कांचन 'डॉक्टरांची विधवा' म्हणून जगणार, इतकेच वाटत राहते. पुस्तक येथेच संपते, डॉक्टरांच्या निधनाने. डॉक्टर पुन्हा यशस्वी झाले असते तर,

डॉक्टर अजून जास्त जगले असते तर, हा विवाह लवकर झाला असता आणि त्यांना अपत्य झाले असते तर...असे अनेक जर-तर मनात डोकावतात.

**– आरती कुलकर्णी**


# लक्ष्यवेध




'लक्ष्यवेध', अतिशय सुंदर आणि अप्रतिम लेखन. कादंबरी हातात घेतली तशी एक दिवसात वाचून पूर्ण झाली. छत्रपती शिवाजी महाराज आणि अफझल खान यांची भेट आणि अफझल खानाचा वध. महाराजांची युद्धनीती आणि बुद्धिचातुर्याची प्रत्येक पानावर वाचताना प्रचिती येते. खानाला मारल्याशिवाय स्वराज्य मिळवता येणार नाही हे राजे पुरते जाणून होते आणि म्हणून यासाठी महाराजांनी राजकारणाचा पट मांडला आणि या दोन राजकारणी धुरंधरांनी खेळलेला डाव म्हणजे लक्ष्यवेध, याचे खूप सुंदर वर्णन केलेले आहे. जरूर वाचावे.

**– शौर्य सुतार**

# जे.आर.डी. एक चतुरस्त्र माणूस





उच्च विचार, उच्च भाषा आणि उच्च वर्तन हे स्वधर्मीय ब्रीद अक्षरशः जगलेले कुटुंब म्हणजे टाटा कुटुंब. टाटा नावातच सर्व काही आहे. टाटा म्हणजे दूरदृष्टी, टाटा म्हणजे समर्पण, टाटा म्हणजे दातृत्व, टाटा म्हणजे निस्सीम देशभक्ती आणि या सर्व गुणांचा महामेरू म्हणजे जहांगीर रतन दादाभाई ऊर्फ जेआरडी. कोणतीही औपचारिक पदवी हाताशी नसताना दूरदृष्टी,

माणसांची पारख, त्यांना हाताळण्याचे कसब, कामाप्रती असलेले समर्पण आणि वेळप्रसंगी घेतलेले कठोर निर्णय यामुळे त्यांनी टाटा उद्योगसमूह एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला. आकाशाबद्दल असलेल्या प्रेमातून सुरू केलेली विमानसेवा नंतर तेवढ्याच प्रेमाने देशाला अर्पण केली. एक रुपया या नाममात्र वेतनावर सुमारे पाच दशके तिचे अध्यक्षस्थान भूषविले हा तर एक विक्रमच आहे. परिपूर्णतेचा ध्यास असलेल्या जेआरडी यांनी स्टॅटिकल, व्यवस्थापनशास्त्र, प्रशिक्षण केंद्र यांसारखे त्या काळी एकदम अपरिचित असलेले विभाग सुरू करून दूरदृष्टी दाखवली. दातृत्व म्हणजे टाटा या समीकरणास जेआरडी  जागले. नारळीकर पिता-पुत्र, शास्त्रज्ञ डॉ. रामण्णा, माजी राष्ट्रपती के. आर. नारायण आणि यासारख्या सुमारे दोन हजारपेक्षा जास्त बुद्धिवंत लोकांना टाटा स्कॉलरशिपचा लाभ मिळाला. टाटा कॅन्सर हॉस्पिटल, टीआयफर यांसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कैक संस्थांना टाटांची भरीव देणगी व जेआरडी यांच्यासारखे भक्कम पाठबळ लाभले. देशाचा विचार करताना आणलेला  बॉम्बे प्लॅन असो अथवा लोकसंख्यावाढीचा विचार करून आणलेले  फॅमिली प्लॅनिंग फाउंडेशन असो, आपल्या समूहाची गरज बाजूला ठेवून त्यांनी नेहरू वा इंदिरा गांधी सरकारला मदतीसाठी अनेक वेळा आपली तज्ज्ञ मंडळी पाठवून दिली. वेळप्रसंगी एक जागरूक नागरिक बनून काही सरकारी विरोधही दर्शवला. खरंतर जेआरडी यांचे इतके पैलू आहेत की ते पुस्तक वाचल्याशिवाय कळणारच नाहीत. त्यांच्या या पैलूंमुळेच त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न प्राप्त झाला. त्यावेळेस असे म्हटले गेले, भारतरत्न या पुरस्काराचा सन्मान झाला. .

**– रेवण लोणकर**

## अकुपार


ध्रुव भट्ट हे मूळ गुजराती लेखक. स्वतः अनुभव घेतल्याशिवाय, एखादा प्रदेश पाहिल्याशिवाय, समजून घेतल्याशिवाय काहीही न लिहिणारे व लिहिण्यासाठी प्रत्यक्ष त्या जागी जाऊन राहणारे लेखक. त्यांची अशाच अनुभवी भटकंती- मधून साकार झालेली कादंबरी ‘अकुपार’ अंजली नरवणे




यांनी अनुवादित केली आहे. अकुपारचा अर्थ इथे सांगणं उचित नाही. ते प्रत्यक्ष वाचून उमजून घेणं योग्य ठरेल. गुजरातमधील 'गीर'बद्दल, तिथल्या सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरणपूरक वैभवाबद्दल भाष्य करणारी कादंबरी. जंगलच्या राजाविषयीच्या प्रत्यक्षदर्शी घटना, त्याचं राजेपण, त्याच्या व्यथा नकळत मनात उतरत जातात. गीरमधील रहिवाशांची आपल्या परिसराबद्दलची समर्पण वृत्ती अनेक प्रसंगांतून व्यक्त होते. एक अंध व्यक्ती अनेक मैल चालत जाऊन सावजांची (सिंहांची) शिकार करू नका अशी विनवणी नवाब व इंग्रज अधिकाऱ्यास करणारा, तसेच डोंगर दत्तक घेऊन त्यांचं थाटामाटात लग्न लावणारा गीरवासी खूप मोठी शिकवण देऊन जातो. आपल्या लग्नात मिळालेली गाय एका प्रसंगी सिंहांचं भक्ष्य होताना पाहणारी व तिचं समर्पण करणारी गीरवासी स्त्री भेटते. अहोरात्र भटकंती करून पर्यटकांचं रक्षण करून सिंहाचा हल्ला अंगावर घेणारा गीरवासी समर्पण भाव शिकवून जातो. तसेच गीरसाठी सतत भटकत राहणारे, सर्व जंगल संपत्ती, प्राणी यांची काळजी घेणारे, स्वतः अनेक दुःखांचा सामना करत असतानासुद्धा गीरच्या भल्याचा विचार करून अहोरात्र झटणारे गीरवासी आपल्याला भेटून काहीतरी शिकवून जातात. असे अनेक प्रसंग खूप वाचनीय आहेत. एखादी अशिक्षित व्यक्तीसुद्धा खूप सोप्या शब्दांत, आपल्या वागण्या- बोलण्यातून जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगून जाते. वैयाक्तिक हेवेदावे, स्वार्थी वृत्ती, खून, मारामाऱ्या, कपट या सर्वांपासून शांतता लाभावी असं लेखन. प्रेमाचा, आपुलकीचा, निसर्गसंवर्धनाचा संदेश देणारी अनेक उदाहरणे वाचण्यास मिळतात, म्हणूनच संपू नये व वाचतच राहावं असं वाटतं. प्रत्येक पर्यावरण-प्रेमीनी आणि सर्वांनी वाचायला हवं असं वाचनीय, वेगळे अनुभव देणारं पुस्तक.

**— उदय ठोंबरे**


# द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्




'द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्' मुक्ता देशपांडे यांचं मराठी अनुवादित पुस्तक. मूळ लेखक जॉन बायेन आयरिश कादंबरीकार आहेत. प्रौढांसाठी अकरा आणि तरुण वाचकांसाठी सहा कादंबऱ्यांचं लेखन त्यांनी केलं आहे. त्यांच्या कादंबऱ्या ५०हून अधिक भाषांमध्ये भाषांतरित झालेल्या आहेत. २००६मध्ये प्रकाशित झालेल्या 'द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्' या कादंबरीला त्याच नावाने २००८मध्ये चित्रपटात रूपांतरित केलेले आहे. हे एक उत्तम पुस्तक आहे. शेवट थोडा अनपेक्षित आणि दुःखी आहे; परंतु एकूणच ही एक उत्तम कथा आहे. ब्रूनोला एक निरागस मूल म्हणून चित्रित केले गेले आहे, ज्याला संशोधन करायला आणि संशोधनाची पुस्तकं वाचायला आवडतं. बेचाळीस भाषांमध्ये भाषांतरे प्रकाशित झालेली दुसऱ्या महायुद्धातील, नऊ वर्षांच्या ब्रूनो नावाच्या लहान मुलाच्या भावविश्वात होणाऱ्या उलथापालथीची ही रहस्यमय कथा. बर्लिन शहर, बर्लिनमधील गजबजलेल्या वस्तीमधील ब्रूनोचे वैभवशाली मोठे घर ते आउट-विथ हे एकमेव छोटे घर आणि तेथील शांतता असा ब्रूनोच्या जीवनातील घडामोडींचा प्रवास. पुस्तकातील महत्त्वाचा भाग म्हणजे कुंपण. आउट-विथ हे सीमा दर्शविणाऱ्या कुंपण विभागणीचे एक शक्तिशाली प्रतीक आहे. भौतिकदृष्ट्या, कुंपण युरोपीय यहुद्यांना कैद करण्याचे काम करते, त्यांना गैर-यहुदी लोकसंख्येपासून शारीरिकरीत्या वेगळे करते. कुंपण, यहुद्यांच्या निकृष्ट दर्जाच्या वैचारिक श्रद्धांचे प्रतीक आहे. अशा या कुंपणाच्या पलीकडे काय आहे, तिकडची माणसं कोण असावीत हे जाणून घेण्याची ब्रूनोला लागलेली उत्सुकता... त्याच शोध मोहिमेत कुंपणाच्या पलीकडचा ब्रूनोला भेटलेला आणि भेटीनंतर त्याला खूप आवडलेला ब्रूनोचा कुरूप दिसणारा मित्र शम्यूल. आणि पुढे काय होतं हे जाणून घ्यायला पुस्तक वाचायला पाहिजे.

**– ॲड. कावेरी पाटील**

# सागरी परिक्रमेचा पराक्रम





अविस्मरणीय अनुभव... सागरी परिक्रमा करणारे पहिले भारतीय म्हणून दिलिप दोंदे यांना ओळखलं जातं. ते भारतीय नौदलातील निवृत्त अधिकारी असून गोव्यात राहतात. त्यांच्या या परिक्रमाने प्रेरित झालेल्या आठ जणांनी त्यांच्याच मार्गदर्शनाने सागरी परिक्रमेचा अविस्मरणीय अनुभव घेतला. त्यापैकी सहा महिलांच्या चमूची कामगिरी लक्षणीय आहे. पृथ्वी पालथी घालायची; पण सागरी मार्गाने, तीही एकट्याने आणि शिडाच्या बोटीतून नऊ महिने चाललेल्या मोहिमेतून. ही सुरस व चमत्कारिक कथा नसून, दोंदे यांनी साहसी समुद्र पर्यटन क्षेत्रात रचलेला अनोखा इतिहास आहे. ते म्हणाले, '१९ऑगस्ट, २००९ रोजी मुंबईपासून सुरू झालेली ही सागर परिक्रमा १९ मे, २०१० ला पुन्हा मुंबईला पोहोचून संपली. या नऊ महिन्यांत दोनशे त्र्याहत्तर दिवसांपैकी एकशे सत्तावन्न दिवस मी पाण्यात होतो. चार बंदरांवर मुक्काम केला. या प्रदक्षिणेत मी तेवीस हजार सागरी मैल अंतर पार केलं. या मोहिमेत वापरण्यात आलेली बोट भारतीय बनावटीची होती. रत्नाकर दांडेकर यांनी ती तयार केली होती. ही साहसी परिक्रमा भारतीय नौदलाचा एक उपक्रम म्हणून करण्यात आली. यासाठी मी स्वेच्छेने पुढाकार घेतला होता. अशा तऱ्हेचा कुठलाही पूर्वानुभव नसताना निर्धार, कौशल्य व कमालीच्या धाडसाची आवश्यकता होती. ते करू शकलो. यासाठी नंतर 'शौर्यचक्र' या पुरस्कारासह आणखी काही मानाच्या पुरस्कारांनी मला गौरविण्यात आलं.'

**— दै. सकाळ, ६.६.२०२१**

# पृथ्वीवर माणूस उपराच!


आज Marvel Studiosच्या 'Eternals' या चित्रपटाचा ट्रेलर बघताना लेखक डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी यांच्या 'पृथ्वीवर माणूस उपराच!' या

पुस्तकाची आठवण झाली. एरिक व्हॉन डॅनिकेन या संशोधकाने मांडलेल्या काही सिद्धान्तांच्या आधारावर लेखकाने या पुस्तकात बरेचसे धक्कादायक दावे केले आहेत. सर्वांत महत्त्वाचा सिद्धान्त हा, की देव म्हणजे परग्रहावरील अतिप्रगत जीव व त्यांनी पृथ्वीवर निर्माण केलेला जीव म्हणजे मानव. इतिहासातील अशक्य वाटणाऱ्या पिरॅमिड व बाकी बऱ्याचशा रचना बनवण्यामागे या अतिप्रगत जीवांची त्या काळी मदत झाली असावी असे लेखकाचे मत आहे.  पुस्तक तर छानच आहे. नसेल वाचले तर नक्की वाचा.




**– प्रथमेश कांबळी**

# डोंगरी ते दुबई




डोंगरी ते दुबई हे मुंबईतील गुन्हेगारी जगतावरील महत्त्वाचे पुस्तक. मुख्यत्वेकरून कुप्रसिद्ध गुन्हेगारी जगतातील डॉन समजल्या जाणाऱ्या दाऊद इब्राहिम (कासकर)ची गुन्हेगारी विश्वातील वाटचाल यात अधोरेखित केली आहे. यातून निर्माण झालेल्या टोळ्या व त्यांच्यातील टोळीयुद्ध मोडीत काढण्यासाठी मुंबई पोलिसांनी केलेले प्रयत्न व केलेली एन्काउन्टर्स. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणून पूर्वीपासूनच प्रसिद्ध असून, सर्वाधिक रोजगार देणारं, स्वप्नपूर्ती करणारं शहर म्हणून नावाजलेलं होतं व आजही आहे. या ठिकाणचा समुद्रकिनारा, माझगाव डॉक येथील मोठे आयात बंदर व त्यामुळे संपूर्ण जगातून येथे होणारी आयात-निर्यात, त्यातून मिळणारे मोठे उत्पन्न, गिरणी, कारखान्यांची निर्मिती, यामुळे रोजगाराला मिळालेली चालना, या कारणामुळे देशातील उत्तर व दक्षिणेकडून कामाच्या शोधात आलेल्या कामगारांचा लोंढा. नंतर गिरणी कामगार संपामुळे वाढलेली बेरोजगारी. मुंबईतील उच्चभ्रू वर्ग, त्यांचं आलिशान राहणीमान, मुंबईतील

झगमगाट, याला मोहून अनेक तरुणांची झटपट श्रीमंत होण्यासाठी गुन्हेगारी जगताकडे वळलेली पाऊले, तस्करी, मटका, जुगार, दारूचे गुत्ते, लुटालूट, खंडणी, खून इत्यादी गुन्ह्यांची मुंबईत झालेली सुरुवात. यातून निर्माण झालेल्या गुंडांच्या टोळ्या, त्यानंतरची रक्तरंजित टोळीयुद्ध, दाऊदची डी कंपनी, अरुण गवळीची कंपनी. दाऊदची अंडरवर्ल्डमधील वाटचाल, त्याला येऊन मिळालेले गुंड व त्यांच्या टोळ्या, इलेक्ट्रॉनिक वस्तू व सोन्याची त्याने केलेली तस्करी. नंतर दाऊदचे दुबईमध्ये झालेले पलायन, दाऊद या गुंड, तस्कराचे नंतर झालेले जागतिक हिटलिस्ट- वरील दहशतवाद्यात रूपांतर. दाऊदचे बॉलीवूड व क्रिकेट जगताशी असलेले संबंध. यातून निर्माण झालेली दाऊदची प्रेमप्रकरणे इत्यादी. हुसेन झैदी यांचे लेखन वाचकाला खिळवून ठेवते. त्यांनी अनेक वर्षं क्राइम रिपोर्टर म्हणून विविध वृत्तपत्रांत केलेलं काम. गुन्हेगारी जगतातील बारकाव्यांचे त्यांनी केलेले वर्णन या पुस्तकाला एक उंचीवर नेऊन ठेवते. याचबरोबर एक शहर म्हणून मुंबईची झालेली डेव्हलपमेन्ट, बांधकामे, तेथे निर्माण झालेली उपनगरे, रोजगारनिर्मिती या निमित्ताने आलेले लोक व शहराची भरभराट याचा पूर्ण लेखाजोखा यातून मिळतो. अंडरवर्ल्ड (छुपे जगत)चे, त्यांच्याशी असलेले राजकारणी, बॉलीवूड क्षेत्राचे पोलिसी संबंध याचे वास्तव दर्शन सामान्य वाचकाला होते.

**– गोपाळ खातोकर**

## व्हाय मेन डोन्ट लिसन ॲण्ड विमेन कान्ट रीड मॅप्स

स्त्री आणि पुरुष यांच्यातील नातेसंबंध का बिघडतात? पुरुषांना हे समजत नाही की स्त्रिया त्यांच्यासारख्या का नाहीत आणि स्त्रियांना वाटतं पुरुषांनी आपल्यासारखं वागावं. याचं कारण म्हणजे स्त्री आणि पुरुष वेगळे आहेत. ते समान पेशींपासून बनलेले आहेत, एवढी एकच गोष्ट त्यांच्यात समान आहे. तुम्ही स्वतःला ओळखावं, तसंच जोडीदाराच्या मनात काय चाललंय ते जाणावं, ज्यामुळे तुमचे आपसातील नातेसंबंध आनंददायी व दृढ





होतील. या पुस्तकातून अनेक गुपितं तुम्हाला समजतील, ज्याचा तुम्हाला तुमचं पुढील आयुष्य सुफल, अधिक प्रेममय व जिव्हाळ्याचं करण्यासाठी नक्कीच उपयोग होईल. स्त्रियांची तक्रार – पुरुष संवेदनाशून्य आहेत. त्यांच्यामध्ये सहिष्णुता नाही. ते जास्त बोलत नाहीत, प्रेम करत नाहीत... पुरुषांची तक्रार – स्त्रिया मूळ मुद्दा सोडून भलतेच आणि खूप जास्त बोलतात, असे आणि अनेक... स्त्रिया या मनकवड्या असतात. त्यांना समोरच्याच्या मनात काय चाललंय ते समजतं. त्यासाठी त्यांना शब्दांतून सांगण्याची गरज नसते. त्यामुळे त्यांची अपेक्षा असते की नवऱ्याला त्यांच्या मनातलं समजावं, तिच्या गरजा ओळखाव्यात; पण तिची देहबोली, तिचे इशारे काही त्याला समजत नाहीत. त्यामुळेच जगभरातील सर्व स्त्रिया पुरुषांना भावनाशून्य म्हणून संबोधतात. स्त्रिया एवढं का बोलतात? कारण त्यांच्या मेंदूच्या दोन्ही गोलार्धांत स्पीच सेंटर्स असतात. स्त्रियांना जास्त बोलण्याची गरज का असते? पुरुषांच्या मेंदूमध्ये अनेक कप्पे असतात आणि त्यात माहिती वेगवेगळी साठवून ठेवण्याची क्षमता असते. दिवसाच्या शेवटी सर्व समस्यांचे वर्गीकरण करून त्याचे फायलिंग झालेले असते. स्त्रियांचा मेंदू माहिती त्याप्रमाणे संकलित करत नाही. समस्या डोक्यामध्ये सतत ताक घुसळल्याप्रमाणे घुसळत राहतात. मग या संकटातून बाहेर पडण्याचा एकच उपाय त्यांच्याकडे उरतो, तो म्हणजे त्या समस्यांविषयी इतरांशी बोलणं. त्यांना त्याची माहिती करून देणं आणि त्याच वेळी त्यांना कोणाकडून त्या समस्यांचा शेवट किंवा त्याच्यावर तोडगा नको असतो. स्त्रियांसाठी बोलणं म्हणजे एकमेकांशी नातं जुळवणं, तर पुरुषांसाठी बोलणं म्हणजे घटना सांगणं. एकमेकांच्या दोषांवर पांघरूण घालण्यातच शहाणपणा आहे. आपण सगळेच सगळ्या गोष्टींत हुशार नसतो. त्यानं फारसं बिघडत नाही. सरावानं गोष्टी येतात; पण तेवढ्यासाठी आपलं किंवा जोडीदाराचं आयुष्य बरबाद करू नये. स्त्रिया नातेसंबंधांत असंतुष्ट राहिल्या तर त्या त्यांच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकत नाहीत आणि पुरुष जर कामाच्या ठिकाणी असंतुष्ट राहिला तर तो त्याच्या नातेसंबंधाला न्याय देऊ शकत नाही. स्त्री आणि पुरुष हे दोन

वेगळ्या संघटनांचे सदस्य आहेत. हा फरक लक्षात घेणं, समजून घेणं गरजेचं आहे, तरच तुम्ही तुमच्या जोडीदाराच्या भावना आणि त्यामागचा कार्यकारण भाव समजून घेऊ शकाल. तिला प्रेम, प्रणय आणि संवाद हवा असतो. त्याला मात्र बायकोकडून असा विश्वास हवा असतो की तो यशस्वी आहे आणि ती तो जे काही देतो त्यावर खूश आहे; पण त्यानं रोमॅन्टिक असणं गरजेचं असतं आणि मुख्य म्हणजे ती जे बोलते ते काळजीपूर्वक, कुठलेही उपाय न सुचवता ऐकणं गरजेचं असतं.

**– विजयकुमार चौगुले**

## मध्यस्थ




गुप्तहेर कथा, रहस्यकथा, साहसकथा. भले मग त्या सत्यकथा असोत अथवा काल्पनिक. साहित्यात त्यांचेही स्थान महत्त्वाचे असतेच. आजूबाजूचे सर्व वातावरण विसरायला लावून वाचकाची मती क्षणभर गुंग करण्याची शक्ती या प्रकारात असते. चला, अशाच एका साहसी मोहिमेवर निघूया. पुस्तक- प्रेमीच्या सदस्यांना या मूळ पुस्तकाचे कर्ते फ्रेडरिक फोरसाइथ नवीन नाहीत. त्यांच्या 'The Fox' या मूळ कादंबरीचा सुधांशु नाईक यांनी आपल्या ग्रूपला परिचय करून दिलाच आहे. त्यांचेच हे आणखी एक पुस्तक. इंग्रजी साहित्यिक फ्रेडरिक फोरसाइथ यांनी बी. बी. सी.मध्ये पोलिटिकल कॉरस्पॉन्डन्ट म्हणूनही काम केले आहे. प्रस्तुत काल्पनिक कादंबरीत त्यांनी आपल्या तिथल्या कामकाज व अनुभवाचा चपखलपणे वापर केला असावा. काही राजकीय नेत्यांची नावे त्यांनी कादंबरीत पदासकट वापरली आहेत. १९७१मध्ये 'The Day of The Jackal' ही त्यांची आणखी एक कादंबरी गाजली होती. या कादंबरीवर याच नावाचा चित्रपट पुढे निघाला. आज आपण परिचय करून घेत असलेल्या कादंबरीवरसुद्धा 'The Negotiator' हा चित्रपट येऊन गेलाय. विलक्षण गतिमान कथानक हे त्याचं वैशिष्ट्य. अमेरिका व रशिया या दोन जागतिक

स्तरावरील बलाढ्य शक्ती. या एकमेकांच्या जरी कट्टर प्रतिस्पर्धी असल्या, तरीही प्रस्तुत कादंबरीत महाविघातक, महाविध्वंसक अशी संरक्षण विषयक क्षेपणास्त्रनिर्मिती करण्यासाठी दोन्ही राष्ट्रांना बंधने घालावीत, या हेतूने या दोन देशांत 'नानटेक्ट' करार होऊ घातला आहे. या पार्श्वभूमीवर कथानक सुरू होते. हा करार होऊ नये असे दोन्ही देशातील उद्योगपतींना आर्थिक हितसंबंधासाठी, तर दोन्हीकडील राजकीय शक्तींना पक्षीय राजकारण, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा यामुळे गैरसोयीचा ठरणार असल्याने नकोसा असतो. साहजिकच तो करार हाणून पाडण्यासाठी जो तो निकराने प्रयत्नास लागतो. त्यातच एक खतरनाक संधिसाधू आंतरराष्ट्रीय गुन्हेगार टोळी यात एन्ट्री घेते. या टोळीचे संबंध व लागेबांधे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या दोन्ही देशांतील मंत्रालयात मोठ्या पदांवर सभ्यतेचे पांढरपेशी बुरखे घालून काम करणाऱ्या, उच्चपदस्थ, महत्त्वाचे, अतिमहत्त्वाचे अधिकारी यांच्यापर्यंत पोचलेले असतात. जरी हे चित्र बहुदा सर्वच देशांत असले तरी सामान्य नागरिकांच्या आकलन शक्तीच्या पार पल्याड असे हे एक निराळे जग असते. हा नानटेक्ट करार होऊ नये यासाठी मग सर्व पातळीवर सर्व शक्ती कार्यरत होतात. याची काहीशी कुणकुण लागून सीआयए व केजीबी देखील जागरूक होते; पण घडायचे ते घडतेच. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या एकुलत्या एक मुलाचे रशियन भूमीतून अपहरण होते. अपहरणकर्ते खंडणी मागतात आणि त्याची सुटका करण्यासाठी नेमला जातो 'क्विन' हा व्यावसायिक 'मध्यस्थ.' सुरवातीला फक्त अपहरणकर्त्यांशी वाटाघाटी करून मुलाची सुखरूप सुटका करून देणे एवढंच काम असणारा क्विन चक्क अपयशी ठरतो. रक्कमही जाते आणि मुलाची हत्याही होते; पण दरम्यान क्विनच्या हाती बरेचसे मोडकेतोडके धागेदोरे लागलेले असतात. त्यामुळे तो हे प्रकरण एकट्याने लढायचा निर्णय घेतो. केजीबी व सीआयए यांचा विरोध पत्करून, त्यांना आपल्या पाठीवर घेऊन, या कृत्यामागची पसरलेली पाळेमुळे रशिया, अमेरिका इंग्लंड व आणखी काही युरोपीय देशांतून खणून काढतो. एकांडा शिलेदार बनलेला निराधार क्विन हत्या करणाऱ्या संपूर्ण टोळीचा मागोवा तर घेतोच; पण त्यांना कळसूत्री बाहुलीप्रमाणे नाचवणाऱ्या आंतरराष्ट्रीय सभ्य गुंडांचाही, उच्च राजकीय नेत्यांचाही पर्दाफाश करतो. कथानकाचा हा सारा प्रवासच सापशिडीसारखा अंदाज न येणारा. विस्मयकारक कलाटण्या देणारा.

गुंतागुंतीचे कूट प्रश्न निर्माण करणारा. राजकारण्यांच्या स्वार्थाच्या, क्रूरतेच्या, बुद्धिचातुर्याच्या अशा एका अनोख्या विश्वात आपण क्विनबरोबरच गुंतून जातो. त्यातील जीवघेण्या पाठलागाचे थरार आपल्या काळजाचे ठोके चुकवतात. उत्कंठा शिगेला पोचते आणि अखेरीस फ्रेडरिक या कोड्याची एखाद्या कुशल सर्जनप्रमाणे हळुवार चिरफाड करत असताना आपल्यालाही एक उत्तम, दर्जेदार कादंबरी वाचल्याचे समाधान मिळते. मूळ लेखकाला जरी हे श्रेय देणे योग्य, तरी त्याचबरोबर मी तरी अनुवादक लीना सोहोनी यांना हे श्रेय काहीसे अधिकच देईन. याचे मुख्य कारण इंग्रजी पुस्तके वाचताना आपल्याला स्वतःच्या शब्दसंग्रहाची मर्यादा पडते. व्याकरणाचा पुरेसा अभ्यास नसेल तर सौंदर्य समजत नाही. म्हणूनच अनुवादक इथे फार महत्त्वाचा दुवा ठरतो. लीना सोहोनी यांनी वरील जबाबदारी - पुस्तकातील क्विन या मध्यस्थाइतकीच चोख पार पाडली आहे. क्विन या कथानायकाची व्यक्तिरेखा हा या कादंबरीचा आत्मा आहे. अशा या जेम्स बॉन्डची आठवण करून देणाऱ्या व्यक्तिरेखेला मूळ इंग्रजीएवढ्याच ताकदीने त्यांनी मराठी भाषेत रंगवले आहे आणि हीच 'मध्यस्थ'ची दमदार अशी जमेची बाजू आहे. कोणत्याही प्रसंगवर्णनात अचूक मराठी शब्दयोजना, मूळ इंग्रजी वातावरण, व्यक्ती, समाज अगदी कशाचाही मूळ बाज न बदलता त्यांनी हा अनुवाद आपल्यापुढे मांडलाय. केवळ या समर्थ अनुवादामुळेच मराठी साहित्यात एका दर्जेदार रहस्यकथेची भर पडली आहे, असेच मला वाटते.

**– राजेंद्र थिटे**

# नॉट विदाऊट माय डॉटर

हे पुस्तक वाचून झाल्यावर बराच वेळ मी अस्वस्थ होते. बेचैन होते. एक अमेरिकन तरुण महिला, स्वतःला व आपल्या लहान मुलीला इराणमधील आपल्या सासरच्या निष्ठुर व क्रूर माणसांपासून स्वार्थी पतीपासून कशी वाचवते, इराण ते अमेरिका हा प्रवास थोडा जीपमधून, थोडा पायी तर थोडा घोड्यावरून, अनोळखी लोकांसोबत पार पाडत सासरच्यांच्या तावडीतून कशी सुटका करून घेते, कशी माहेरी सुखरूप पोहचते, हे सगळं वाचताना मनाची प्रचंड घालमेल होत राहते. आणि हे सगळं करताना तिला एकटीला

निसटण्याची संधीही मिळते; पण मुलीला आपल्याबरोबर घेतल्याशिवाय आपण एकटे जाणार नाही, हा तिने निश्चय केलेला असतो. म्हणूनच कादंबरीचं नाव 'नॉट विदाऊट माय डॉटर' हे योग्यच वाटतं. तिची जिद्द ही पराकोटीची आहे. एकदा निश्चय केला की तो कसा तडीस न्यायचा, अन्यायाशी कसं झगडायचं हे या कादंबरीत वाचायला मिळतं. लीना सोहोनींची ओघवती भाषा कादंबरीला न्याय देणारी आहे. जणू काही सगळं डोळ्यांसमोर घडत आहे, असं वाटतं. तिला मदत करणाऱ्या माणसांविषयी ती म्हणते, 'आपल्याला मदत ही कोणाकडून मिळेल हे आपण सांगू शकत नाही. मदत करणारी माणसं कोणत्याही जातीची, धर्माची, देशाची असू शकतात. ती माणसे एका अज्ञात शक्तीने आपल्यापर्यंत पोहचवलेली असतात.




**– शैलजा भास्कर दीक्षित**

# आपण सारे अर्जुन


कथाकथनकार, आर्किटेक्ट, व्हायोलिन व हार्मोनिअम वादक, उत्तम रसिक आणि उत्तम फोटोग्राफर, सुंदर हस्ताक्षर आणि सुंदरतेचं वेड असणारे, सुंदर रस्ता, सुंदर इमारत, सुंदर सजावट आणि मनाने सुंदर असणाऱ्या माणसांचे चाहते. म्हणूनच त्यांच्या कथा या सुंदर मनांवर अणि विचारांवर आधारित असणाऱ्या. मनाचे कंगोरे उत्तम निरीक्षणामुळे मांडता येणाऱ्या. विनोदी कथांमध्येही एक सत्यतेची किनार असणाऱ्या कथा, खरं तर त्या कथा नाहीतच; कारण त्या अतिरंजित किंवा काल्पनिक नाहीत. एका व्यक्तीच्या विचार-आचारांची पद्धत. 'वपु' त्याला 'पॅटर्न' म्हणायचे. 'वपुं'नी पॅटर्न्स मांडले. जे आपल्यासहित, आपल्या अवतीभोवती दिसतात आणि म्हणूनच त्या पॅटर्न्सना दाद मिळते. विनोदी



कथांमधून हसवता हसवता एक शल्य भिडत राहतं आणि चटका लावून जातं. ही अशीच जीवनाची तऱ्हा आहे, हे सहज, सोप्या शब्दांत आकलन होत जातं. महाराष्ट्र सरकारनं त्यांना 'उत्तम लेखक' म्हणून सन्मानित केलं आहे. गीतेतला, महाभारतामधला अर्जुन आणि मी स्वत: किंवा मला भेटणारी प्रत्येक गोंधळलेली व्यक्ती यात मला फरकच वाटत नाही. कृष्णावतार संपला, तो संपलाच! अर्जुनाचा वंश विसाव्या शतकापर्यंत चालूच आहे. अर्जुनाच्या शंभर पटीनं धृतराष्ट्राच्या शंभर मुलांचाही वंश तितक्या पटीनं वाढतोय. निवडणुकीच्या तिकिटांच्या रांगेत उभा आहे. पुन्हा मत देताना विचारवंतांचा अर्जुन होणार. अर्जुनाला समोर शत्रू दिसेचना; आप्त दिसले; कारण ते आप्त होतेच. ज्यांना दाखवण्यासाठी सिंहासन मिळवायचं, त्यांनाच मारल्यावर राज्याभिषेक कुणासमोर करायचा?

**– अक्षय ताजणे**

MARI MARI JAY SARIR




Hello! Although, we do not know each other, thought of writing to you after reading your book of poems that I discovered while browsing Amazon. Enjoyed reading it a lots. Some of the poems reminded me of the poetry of Elizabeth Bishop. I could also discern a subtle positive influence of Arundhati Roy in your writing, which is a great thing. My best wishes to you and your poems.

**- Manoj V**

**१६ जुलै ते १५ ऑगस्ट २०२१ दरम्यानचा दिनविशेष**
दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ जुलै दरम्यान खास सवलत**

**१५ जुलै - आनंदराव पांडुरंग खरात यांचा जन्मदिन**
‘शर्यती स्पर्धा खेळ’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-**

---

**१७ जुलै - अर्ल स्टॅन्ले गार्डनर यांचा जन्मदिन**
‘द केस ऑफ द केअरलेस क्यूपिड’, ‘द केस ऑफ द काउंटरफिट आय’, ‘द केस ऑफ द क्रिमसन किस’, ‘द केस ऑफ द क्रुकेड कँडल’, ‘द केस ऑफ द डेडली टॉय’, ‘द केस ऑफ द डेम्यूर डिफेन्डन्ट’, ‘द केस ऑफ द हॉन्टेड हसबन्ड’, ‘द केस ऑफ द हाऊलिंग डॉग’, ‘द केस ऑफ द आइस-कोल्ड हॅन्ड्स’, ‘द केस ऑफ द लकी लूझर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत २०९०/- । सवलत किंमत १४४९/-**

---

**१८ जुलै - लॉरेन स्क्रग्ज यांचा जन्मदिन**
‘एक लढा असाही...’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

---

**१९ जुलै - सूर्यकांत जाधव यांचा जन्मदिन**
‘आघात’, ‘अस्मिता’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**२० जुलै - डॅनियन ब्रिंकली यांचा जन्मदिन**
‘सीक्रेट्स ऑफ द लाइट’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत ११९/-**

---

**२१ जुलै - माधवी देसाई यांचा जन्मदिन**
‘असं म्हणू नकोस’, ‘धुमारे’, ‘हरवलेल्या वाटा’, ‘कांचनगंगा’, ‘कथा सावलीची’, ‘किनारा’, ‘मंजिरी’, ‘नियती’, ‘प्रार्थना’, ‘सागर’, ‘शुक्रचांदणी’

या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६७०/- । सवलत किंमत १०४९/-**

---

**२१ जुलै - अर्नेस्ट हेमिंग्वे यांचा जन्मदिन**

'घणघणतो घंटानाद' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३६९/-**

---

**२१ जुलै - मायकेल कॉनेली यांचा जन्मदिन**

'सिटी ऑफ बोन्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २२९/-**

---

**२२ जुलै - धनंजय बिजले यांचा जन्मदिन**

'लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा', 'अण्णा हजारे : भ्रष्टाचाराच्या विरोधातील भारतीय लढ्याचा चेहरा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**२३ जुलै - जीतेंद्र दीक्षित यांचा जन्मदिन**

'३५ दिवस : २०१९ने दिली महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३३०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२५ जुलै - स. शं. देसाई यांचा जन्मदिन**

'अखेरची लढाई', 'महापर्व' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६९०/- । सवलत किंमत ४२९/-**

---

**२८ जुलै - आशा बगे यांचा जन्मदिन**

'निसटलेले', 'पाऊलवाटेवरले गाव', 'प्रतिद्वंद्वी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २७९/-**

---

**२८ जुलै - कॅरोल हिगिन्स क्लार्क यांचा जन्मदिन**

'झॅप्ड' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत १०९/-**

**२९ जुलै - तिमिरी एन. मुरारी यांचा जन्मदिन**
'द तालिबान क्रिकेट क्लब' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**२९ जुलै - करेन रोझ यांचा जन्मदिन**
'स्क्रीम फॉर मी', 'डाय फॉर मी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ९८०/- । सवलत किंमत ५४९/-**

---

**२९ जुलै - प्रभाकर परांजपे यांचा जन्मदिन**
'काळोखाचे थेंब', 'पत्रकारितेची मूलतत्त्वे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**२९ जुलै - जे.आर.डी. टाटा यांचा जन्मदिन**
'जेआरडी टाटा यांची पत्रं', 'कीनोट : जे.आर.डी. टाटा', 'टाटा – एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती', 'जेआरडी : एक चतुरस्र माणूस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११२५/- । सवलत किंमत ६९९/-**

## खालील संचांवर १ ते १५ ऑगस्ट दरम्यान खास सवलत

**१ ऑगस्ट - हर्मन मेलव्हिल यांचा जन्मदिन**
'शिस्तीचा बळी', 'पाचूचे बेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २२९/-**

---

**१ ऑगस्ट - रॉबर्ट जेम्स वॉलर यांचा जन्मदिन**
'अद्वैत' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २१९/-**

---

**२ ऑगस्ट - दिपा महानवर यांचा जन्मदिन**
'विमुक्ती' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**३ ऑगस्ट - लिऑन युरिस यांचा जन्मदिन**

‘एक्झोडस’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ३३९/-**

---

**४ ऑगस्ट - राजीव तांबे यांचा जन्मदिन**

‘बब्बड मालिका भाग १’, ‘बंटू बसला ढगात संच’, ‘ससोबा -हसोबा मालिका भाग १’, ‘ससोबा-हसोबा मालिका भाग २’ या सर्व संचांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८४०/- । सवलत किंमत ४७९/-**

---

**४ ऑगस्ट - लीना दामले यांचा जन्मदिन**

‘अंतरिक्षाच्या अंतरंगात’, ‘कथारूपी खगोलशास्त्र’, ‘अशक्य भौतिकी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४१९/-**

---

**४ ऑगस्ट - जागतिक मैत्री दिन**

‘चौघीजणी’, ‘टू ब्लू’, ‘मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा’, ‘फाईव्ह पॉइंट समवन’, ‘द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ’, ‘एक होता मित्र’, ‘दोस्त’, ‘अदान ॲण्ड ईव्हा’, ‘मैत्री अशी आणि तशी...’, ‘बेधुंद’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२३५/- । सवलत किंमत १४१९/-**

---

**५ ऑगस्ट - डेव्हिड बल्डासी यांचा जन्मदिन**

‘द सिम्पल ट्रूथ’, ‘सेव्हिंग फेथ’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ४६९/-**

---

**५ ऑगस्ट - रिचर्ड प्रेस्टन यांचा जन्मदिन**

‘मायक्रो’, ‘द डेमन इन द फ्रीझर’, ‘द हॉट झोन’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९७०/- । सवलत किंमत ४८९/-**

---

**५ ऑगस्ट - विजया राजाध्यक्ष यांचा जन्मदिन**

‘अखेरचे पर्व’, ‘अवतीभवती’, ‘उत्तरार्ध’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६००/- । सवलत किंमत ३४९/-**

**५ ऑगस्ट - टॉड बर्पो यांचा जन्मदिन**
'स्वर्गाचा साक्षात्कार' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

---

**६ ऑगस्ट - हिरोशिमा / परमाणू दिन**
'वॉर्सा ते हिरोशिमा', 'नागासाकी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ५९९/-**

---

**७ ऑगस्ट - डेबोरा एलिस यांचा जन्मदिन**
'टू ब्लू', 'नो ऑर्डिनरी डे', 'माय नेम इज परवाना', 'द ब्रेडविनर', 'परवाना', 'शौझिया', 'आय एम अ टॅक्सी', 'सेक्रेड लीफ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११७०/- । सवलत किंमत ६४९/-**

---

**७ ऑगस्ट - ग्रेग चॅपल यांचा जन्मदिन**
'फिट फॉर ५०+ फॉर मेन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ८०/- । सवलत किंमत ५९/-**

---

**८ ऑगस्ट - वैशाली कार्लेकर यांचा जन्मदिन**
'जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी', 'विक्रम वेताळ मालिका भाग १' (पुतळे जिवंत झाले आणि इतर कथा, राजपुत्राचा निर्णय, गुप्त खजिना, खरं बक्षीस), 'विक्रम वेताळ मालिका भाग २' (दैवी सिंहासन आणि इतर कथा, टेकडीवरचं देऊळ, जादूची साखळी, समुद्रातली अप्सरा), 'विक्रम वेताळ मालिका भाग ३' (राजाचे रक्षण आणि इतर कथा, राजाची साधना, जादूचा रत्नहार, ज्योतिषाचं नशीब) या तीन भागांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ५७९/-**

---

**८ ऑगस्ट - सारा ड्युनांट यांचा जन्मदिन**
'सेक्रेड हार्ट्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २७९/-**

---

**८ ऑगस्ट - शंकर पाटील यांचा जन्मदिन**
'आभाळ', 'बंधारा', 'भेटीगाठी', 'धिंड', 'गारवेल', 'घालमेल', 'इल्लम',

‘जुगलबंदी’, ‘कथा अकलेच्या कांद्याची’, ‘खुळ्याची चावडी’, ‘खुशखरेदी’, ‘लवंगी मिरची कोल्हापूरची’, ‘पाटलांची चंची’, ‘पाऊलवाटा’, ‘फक्कड गोष्टी’, ‘शापित वास्तू’, ‘श्रीगणेशा’, ‘ताजमहालमध्ये सरपंच’, ‘टारफुला’, ‘वळीव’, ‘वावरी शेंग’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २७४०/- । सवलत किंमत १३५४/-**

---

**१० ऑगस्ट - फुलनदेवी यांचा जन्मदिन**

‘मी फुलनदेवी’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २६९/-**

---

**११ ऑगस्ट - वि. स. वाळिंबे यांचा जन्मदिन**

‘नेताजी’, ‘वॉर्सा ते हिरोशिमा’, ‘वुइ, दि नेशन’, ‘वुइ, दि पीपल’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६६५/- । सवलत किंमत १०४९/-**

---

**१३ ऑगस्ट - आचार्य अत्रे यांचा जन्मदिन**

‘आचार्य अत्रे बारा गावचं पाणी’, ‘काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २६९/-**

---

**१३ ऑगस्ट - डॉ. अनिल गांधी यांचा जन्मदिन**

‘अफलातून मेंदू’, ‘मना सर्जना’, ‘धन्वंतरी घरोघरी’, ‘संजीवनी उच्च तंत्रज्ञानाची’, ‘युद्ध कोरोनाशी’, ‘गुंतवणुकीची कामधेनू’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५२०/- । सवलत किंमत ८९९/-**

---

**१५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन**

‘भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया’, ‘फ्रीडम ॲट मिडनाइट’, ‘मोहनदास’, ‘परमवीरचक्र’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८१५/- । सवलत किंमत ८९९/-**

# Make your own Combo Offer

ना किंमतीचं बंधन,
पुस्तकांच्या खरेदीवर घसघशीत सवलत

## बनवा तुमचा स्वत:चा combo

| व्यक्तिगत खरेदी<br>किमान २० पुस्तके | सभासदत्व असलेल्या ग्रंथालयांसाठी<br>किमान १०० पुस्तकांच्या खरेदीवर |
|---|---|

सवलत फक्त मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांवर । एका पुस्तकाची एकच प्रत




# ३५% सवलत

मेहता पब्लिशिंग हाऊस | मेहता बुक सेलर्स
sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
G Pay +91 94223 23039 ९४२०५९४६६५

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. CSO/Pune City/SR/3/2021 - Date : 10/01/2021
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/07/2021 Posting Date : 11/07/2021


## नवीन संहिता... नवा आशय...













**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________